Registered No. B. 1.

THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 20TH MAY 1897.

☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

# PART IX.—Marathi Acts, &c.

## सन १८८२ चा आक्ट २ रा.

( तारीख १३ माहे जानेवारी सन १८८२ रोजीं आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं मंजूर केला. )

## सन १८८२ चा हिंदुस्थानचा ट्रस्टांबाबद आक्ट.

### अनुक्रमणिका.

उद्देश.

बाब १.

प्रारंभींचे ठराव.

कलमें.

१. लहान सरनामा.
   सुरवात.
   स्थानिक व्याप्ति.
   कायम ठेविलेल्या गोष्टी.
२. कायदे रद्द करणें.
३. अर्थाचें कलम.
   करारांच्या आक्टांत व्याख्या केलेल्या संज्ञा.

कलमें.

बाब २.

ट्रस्ट उत्पन्न करण्याविषयीं.

४. कायदेशीर हेतु.
५. स्थावर मिळकतीचा ट्रस्ट.
   जंगम मिळकतीचा ट्रस्ट.
६. ट्रस्ट उत्पन्न करणें.
७. कोणाला ट्रस्ट उत्पन्न करितां येतील.
८. ट्रस्टचा विषय.
९. हिताधिकारी कोण होऊं शकेल.
   हिताधिकाऱ्याकडून हक्कत्याग.

कलमें.

१०. ट्रस्टी कोण होऊं शकेल.

ट्रस्ट पतकरण्याविषयीं कोणीहि बांधलेला नाहीं.

ट्रस्टचा पतकर.

ट्रस्टचा हक्कत्याग.

---

## बाब ३.

### ट्रस्टींचीं कामें व जबाबदाऱ्या यांविषयीं.

११. ट्रस्टीनें ट्रस्ट बजावणें.

१२. ट्रस्टीनें ट्रस्टच्या मिळकतीच्या स्थितीविषयीं माहिती करून घेणें.

१३. ट्रस्टच्या मिळकतीवरील सत्ताधिकार ट्रस्टीनें संभाळणें.

१४. ट्रस्टीनें हिताधिकाऱ्याला प्रतिकूळ असा सत्ताधिकाराविषयीं हक्क सांगतां कामा नये.

१५. ट्रस्टीनें काळजी घेणें जरूर आहे.

१६. नाश होण्याजोग्या मिळकतीचें रूपांतर.

१७. ट्रस्टीनें निष्पक्षपाती असणें.

१८. ट्रस्टीनें खराबी होऊं न देणें.

१९. हिशोब व माहिती.

२०. ट्रस्टचा पैसा लावणें.

२१. जमिनीच्या सुधारणुकेचा आक्ट याअन्वयें सरकारास लावून दिलेल्या जमिनीचें गहाण.

सरकारी सेविंग ब्यांकेमध्यें पैसा ठेवणें.

२२. निर्दिष्ट केलेल्या वेळाच्या आंत विकण्याविषयीं ज्या ट्रस्टीला सांगितलेलें असेल त्याकडून विक्री.

२३. विश्वासघाताबदल जबाबदारी.

२४. ट्रस्टीला वजावाट करण्याची मोकळीक नाहीं.

२५. अगोदरच्या ट्रस्टीच्या कसुरीबदल जबाबदारी नाहीं.

कलमें.

२६. सहट्रस्टीच्या कसुरीबदल जबाबदारी नाहीं.

पावती देण्यामध्यें अनुकूलतेसाठीं सामील होणें.

२७. सहट्रस्टींची वेगवेगळी जबाबदारी.

सहट्रस्टींमध्यें हिंसेरसी.

२८. हिताधिकाऱ्यानें केलेल्या तबदिलीची खबर नसून अदा करणारा ट्रस्टी जबाबदार नाहीं.

२९. हिताधिकाऱ्याचा हक्कसंबंध सरकाराकडे गुन्हेगारीदाखल जाईल तेव्हां ट्रस्टीची जबाबदारी.

३०. ट्रस्टींला नुकसानापासून अभय.

---

## बाब ४.

### ट्रस्टीचे हक्क व अधिकार यांविषयीं.

३१. सत्ताधिकाराच्या खतांवर हक्क.

३२. खर्च भरून घेण्याचा हक्क.

चुकीनें अधिक पैसा दिला असतां तो परत मिळण्याचा हक्क.

३३. विश्वासघातानें फायदा करून घेणाऱ्या मनुष्याकडून नुकसानाची भरपाई होण्याचा हक्क.

३४. ट्रस्टच्या मिळकतीच्या व्यवस्थेच्या संबंधानें अभिप्रायाकरितां कोर्टाला अर्ज करण्याचा हक्क.

३५. हिशोब नक्की करण्याबाबद हक्क.

३६. ट्रस्टीचा साधारण अधिकार.

३७. लाट करून जाहीर लिलावानें अगर खासगी करारानें विकण्याचा अधिकार.

३८. विशेष शर्तींअन्वयें विकण्याचा अधिकार.

विकत घेण्याचा व पुनः विकण्याचा अधिकार.

ट्रस्टची मिळकत विकण्याला वेळाची मोकळीक.

३९. दुसऱ्याच्या नांवीं करून देण्याचा अधिकार.

४०. मिळकत लावण्याच्या संबंधानें फेरफार करण्याचा अधिकार.

कलमें.

४१. अल्पवयी मनुष्यांची मिळकत त्यांच्या पालनाकडे वगैरे लावण्याचा अधिकार.

४२. पावत्या देण्याचा अधिकार.

४३. तोडजोड वगैरे करण्याचा अधिकार.

४४. अनेक ट्रस्टींतून एकजण हक्कत्याग करील किंवा मरण पावेल तर बाकीच्यांना अधिकार.

४५. हुकुमनाम्यावरून ट्रस्टीचे अधिकार तहकूब.

## बाब ५.

### ट्रस्टींच्या नालायकीविषयीं.

४६. पतकरानंतर ट्रस्टीला त्याग करतां येत नाहीं.

४७. ट्रस्टीला आपलें काम वगैरे सोंपून देतां येणार नाहीं.

४८. सहट्रस्टी एकएकटे काम चालवूं शकत नाहींत.

४९. नजरेस येईल त्याप्रमाणें करण्याच्या अधिकारावर निर्बंध.

५०. ट्रस्टीला कामाबद्दल बोजा घालतां येणार नाहीं.

५१. ट्रस्टीला ट्रस्टच्या मिळकतीचा आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं उपयोग करतां येणार नाहीं.

५२. विक्रीबदलचा ट्रस्टी अगर त्याचा मुखत्यार याला विकत घेतां येणार नाहीं.

५३. ट्रस्टीला परवानगीशिवाय हिताधिकाऱ्याचा हक्कसंबंध विकत घेतां येणार नाहीं.

खरेदीबदलचा ट्रस्टी.

५४. सह-ट्रस्टींला आपल्यापैकीं एकाला कर्जी देतां येणार नाहीं.

## बाब ६.

### हिताधिकाऱ्याचे हक्क व जबाबदाऱ्या यांविषयीं.

५५. भाडें व उत्पन्न यांवर हक्क.

५६. विशेष बजावणीबदल हक्क.

कबजा तबदील करून मिळण्याचा हक्क.

कलमें.

५७. ट्रस्टचा लेख, हिशोब वगैरे पाहण्याचा व त्यांच्या नकला घेण्याचा हक्क.

५८. हितसंबंध तबदील करून देण्याचा हक्क.

५९. ट्रस्टच्या बजावणीकरितां दावा करण्याचा हक्क.

६०. योग्य ट्रस्टी मिळण्याचा हक्क.

६१. कोणतेंहि कर्तव्य करण्याचें भाग पाडण्याचा हक्क.

६२. ट्रस्टीकडून अन्यायाची खरेदी.

६३. ट्रस्टच्या मिळकतीचा पाठलाग करणें—

तिसऱ्या मनुष्यांच्या हातीं असतांना;

ज्यांत तिचें रूपांतर झालेलें असेल त्यामध्यें.

६४. कित्येक तबदील करून घेणारांचे हक्क कायम ठेवणें.

६५. अन्यायानें रूपांतर केलेली ट्रस्टची मिळकत ट्रस्टीनें संपादन करणें.

६६. मिळकत मिसळल्याच्या बाबतींत हक्क.

६७. भागीदार-ट्रस्टीनें ट्रस्टची मिळकत अन्यायानें भागीदारीच्या कामीं लावली असतां.

६८. विश्वासघातामध्यें सामील होणाऱ्या हिताधिकाऱ्याची जबाबदारी.

६९. हिताधिकाऱ्याकडून तबदील करून घेणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

## बाब ७.

### ट्रस्टीचा हुद्दा रिकामा होणें याविषयीं.

७०. हुद्दा कशानें रिकामा होतो.

७१. ट्रस्टी हुद्यावरून दूर होणें.

७२. ट्रस्टांतून दूर होण्याविषयीं अर्ज.

७३. मरणाच्यावगैरे कारणानें नव्या ट्रस्टींची नेमणूक.

७४. कोर्टाकडून नेमणूक.

नवे ट्रस्टी निवडण्याविषयीं नियम.

कलमें.

७५. नव्या ट्रस्टींमध्यें ट्रस्टची मिळकत निविष्ट होणें.

नव्या ट्रस्टींचे अधिकार.

७६. ट्रस्ट मागें उरतो.

## बाब ८.

### ट्रस्ट नष्ट होणें याविषयीं.

७७. ट्रस्ट कसा नष्ट होतो.

७८. ट्रस्ट रद्द करणें.

७९. ट्रस्टींनीं योग्य रीतीनें जें कांहीं केलें असेल तें ट्रस्ट रद्द केल्यानें निष्फळ न होणें.

## बाब ९.

### ट्रस्टच्या स्वरूपाच्या कित्येक जबाबदाऱ्यांविषयीं.

८०. कोणत्या बाबतींत ट्रस्टच्या स्वरूपाची कर्तव्यता उत्पन्न होते.

८१. हितसंबंधाची व्यवस्था करण्याचा तबदील करणाराचा इरादा होता असें दिसून येत नसेल तेव्हां.

८२. मिळकत एकाला तबदील करून दिली असून तिचा मोबदला दुसऱ्यानें दिला असेल तेव्हां.

८३. बजावतां न येण्याजोगा अथवा ट्रस्टची मिळकत निश्शेष न होतां बजावलेला ट्रस्ट.

कलमें.

८४. गैरकायदेशीर हेतूकरितां तबदील.

८५. गैरकायदेशीर हेतूकरितां मृत्युलेखदान.

जें मृत्युलेखदान रद्द करणें सक्तीनें मना केलें असेल तें.

८६. रद्द होण्याजोग्या करारानुसारें तबदील.

८७. रिणको हा धनकोचा प्रतिनिधि होणें.

८८. विश्वस्तानें करून घेतलेला फायदा.

८९. अयोग्य दाब चालवून करून घेतलेला फायदा.

९०. उप-मालकानें करून घेतलेला फायदा.

९१. चालू कराराची खबर असून संपादन केलेली मिळकत.

९२. ट्रस्टवर धारण करण्यासाठीं मिळकत विकत घेण्याचा करार करणाऱ्या मनुष्याकडून खरेदी.

९३. तोडजोड करणाऱ्या अनेक धनकोंतून एकजणानें गुप्त रीतीनें करून घेतलेला फायदा.

९४. ज्यांबद्दल स्पष्टपणें ठरविलेलें नाहीं अशा बाबतींत अन्वयावरून निघणारे ट्रस्ट.

९५. कर्तव्यतेनें बद्ध झालेल्या मनुष्याचीं कामें, जबाबदाऱ्या व नालायकी.

९६. खऱ्या भावानें खरीद करणारांच्या हक्कांचा बचाव.

परिशिष्ट—कायदे रद्द केले ते.

# सन १८८२ चा आक्ट २ रा.

(तारीख १३ माहे जानेवारी सन १८८२ रोजीं आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं मंजूर केला.)

**खासगी ट्रस्ट आणि ट्रस्टी यांबाबदचा कायदा निश्चित करून सुधारण्याविषयीं आक्ट.**

ज्याअर्थीं खासगी ट्रस्ट आणि ट्रस्टी यांबाबदचा कायदा निश्चित करून सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:— उद्देश.

## बाब १.

### प्रारंभींचे ठराव.

१. या आक्टास "सन १८८२ चा हिंदुस्थानचा ट्रस्टांबाबद आक्ट" असें ह्मणावें; आणि तो सन १८८२ च्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल. लहान सरनामा. सुरुवात.

तो पहिल्याप्रथम, मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल, वायव्य प्रांत व पंजाब यांचे लेफ्टेनंट-गव्हर्नर, आणि अयोध्या, मध्य प्रांत, कूर्ग व आसाम यांचे चीफ कमिशनर, यांपैकीं प्रत्येकाच्या वहिवाटीखालील मुलुखांस लागू होतो; आणि स्थानिक सरकाराला, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा* देऊन, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या कोणत्याहि इतर भागास वेळोवेळीं लागू करतां येईल. परंतु यांतील कोणत्याही मजकुरावरून, वकफसंबंधीं मुसलमानी शऱ्यांतील कानूंस, किंवा अविभक्त कुटुंबांतील असामींचा परस्परसंबंध कोणत्याही संप्रदायसिद्ध किंवा व्यक्तिकृत कायद्यानें ठरलेला असेल त्यास बाध येत नाहीं, किंवा तो मजकूर सार्वजनिक किंवा खासगी धर्मसंबंधी किंवा दानधर्मसंबंधी नेमणुकींस, किंवा लढाईमध्यें मिळालेली लूट ती मिळविणारांमध्यें वांटून देण्याबदलच्या ट्रस्टांस लागू होत नाहीं; आणि या आक्टाच्या दुसऱ्या बाबींतील कोणताहि मजकूर सदरहू तारखेपूर्वीं उत्पन्न केलेल्या ट्रस्टांस लागू होत नाहीं. स्थानिक व्याप्ति. कायम ठेविलेल्या गोष्टी.

२. या आक्टास जोडलेल्या परिशिष्टांत सांगितलेला स्टाटयूट व आक्ट, ज्या मुलुखांस हा आक्ट त्या त्या वेळीं लागू असेल त्यांमध्यें त्या परिशिष्टांत सांगितलें आहे तितक्या अंशीं, रद्द होतील. कायदे रद्द करणें.

३. "ट्रस्ट" ह्मणजे मिळकतीच्या मालकीला जोडलेली कर्तव्यता असून, ती दुसऱ्याच्या हिताकरितां, अगर दुसऱ्याच्या व मालकाच्या हिताकरितां, मालकावर ठेवलेल्या व त्यानें पतकरलेल्या, किंवा त्यानें कळवून पतकरलेल्या विश्वासावरून उपस्थित होते: अर्थाचें कलम. "ट्रस्ट":

* हा आक्ट, जुडिशियल डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर ४८०२, तारीख ८ माहे सप्टेंबर सन १८९१, यावरून तारीख मजकूर पासून मुंबई इलाख्यांत अमलांत आला.

"ट्रस्टचा कर्ता": असा विश्वास ठेवणारा अगर कळविणारा जो मनुष्य त्यास "ट्रस्टचा कर्ता" ह्मणतात:

"ट्रस्टी": असा विश्वास पतकरणारा जो मनुष्य त्यास "ट्रस्टी" ह्मणतात:

"हिताधिकारी": ज्या मनुष्याच्या हिताकरितां असा विश्वास पतकरला जातो त्यास "हिताधिकारी" ह्मणतात:

"ट्रस्टची मिळकत": ट्रस्टचा जो विषय त्यास "ट्रस्टची मिळकत" किंवा "ट्रस्टचा पैसा" ह्मणतात:

"हितसंबंध": "हितसंबंध" अगर हिताधिकाऱ्याचा "हक्कसंबंध" ह्मणजे, ट्रस्टच्या मिळकतीचा मालक या नात्यानें ट्रस्टीवर जो हिताधिकाऱ्याचा हक्क तो होय;

"ट्रस्टचा लेख": आणि ज्यांत ट्रस्ट कळविलेला आहे असा कोणताही लेख असल्यास त्यास "ट्रस्टचा लेख" ह्मणतात:

"विश्वासघात": त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांत ट्रस्टीकडे ट्रस्टी या नात्यानें सोंपलेल्या कोणत्याही कामाचा जो भंग त्याला "विश्वासघात" ह्मणतात:

"नोंदलेलें": आणि या आक्टांत, विषयाला अथवा पूर्वापर संबंधाला कांहीं बाध येत नसल्यास, "नोंदलेलें" याचा अर्थ, दस्तऐवज नोंदण्याबदलचा जो कायदा त्या त्या वेळीं अमलांत असेल त्याअन्वयें नोंदलेलें, असा आहे:

"खबर": जेव्हां कोणा मनुष्यास एकादी गोष्ट खरोखर ठाऊक असेल, अगर त्यानें जाणून बुजून चौकशी करण्याचें सोडलें नसतें अथवा मोठी हयगई केली नसती तर त्याला ती ठाऊक झाली असती असें असेल, अगर सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट, कलम २२९, यांत सांगितल्याप्रमाणें हकीकत असून त्याच्या गुमास्त्याला त्या गोष्टीची माहिती दिली असेल अथवा त्यानें ती मिळविली असेल, तेव्हां त्या मनुष्यास त्या गोष्टीची खबर आहे असें ह्मणतात;

कराराच्या आक्टांत व्याख्या केलेल्या संज्ञा. आणि या आक्टांत उपयोग केलेल्या ज्या संज्ञांच्या व्याख्या सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट यांत दिलेल्या आहेत त्या सर्व संज्ञांचे अर्थ त्या आक्टांत जे केलेले आहेत तेच होत असें समजलें पाहिजे.

---

## बाब २.

### ट्रस्ट उत्पन्न करण्यांविषयीं.

कायदेशीर हेतु. ४. कोणत्याहि कायदेशीर हेतूकरितां ट्रस्ट उत्पन्न करतां येईल. ट्रस्टचा हेतु, (अ) त्याची कायद्यानें मनाई केली नसेल, किंवा (ब) त्याचें स्वरूप असें असेल कीं तो मान्य केला असतां, त्यामुळें कोणत्याहि कायद्यांतील ठराव निष्फळ होणार नाहींत, किंवा (क) त्यांत कपट नसेल, किंवा (ड) त्यामुळें दुसऱ्या मनुष्याच्या शरीरास किंवा मिळकतीस नुकसानी व्हावयाची नाहीं अथवा होईल असें दिसत नाहीं, किंवा (ई) तो अनीतीचा किंवा राजनीतीशीं विरुद्ध आहे असें कोर्ट मानीत नसेल, तर कायदेशीर होय.

ज्याचा हेतु गैरकायदेशीर असेल असा दरेक ट्रस्ट निरर्थक होय. आणि ट्रस्ट दोन हेतूंकरितां उत्पन्न केलेला असून, त्यांतून एक कायदेशीर आणि दुसरा गैरकायदे-

शीर असेल, व ते दोन हेतु वेगवेगळे काढतां येणार नाहींत, तेव्हां तो सगळा ट्रस्ट निरर्थक होय.

**खुलासा**.—या कलमामध्यें, "कायदा" ह्या संज्ञेंत, ट्रस्टची मिळकत स्थावर असून परराज्याच्या मुलुकांत असेल तेव्हां, अशा मुलुकाच्या कायद्याचा समावेश होतो.

उदाहरणें.

(अ) अ हा, ट्रस्टनें बच्या नांवें मिळकत करून देऊन तिच्यापासून होणारा फायदा, वेवारशी सांपडलेल्या मुली कसबिणीप्रमाणें तयार करावयाच्या आहेत त्यांच्या पालनपोषणाकडे लावावा असें सांगतो. हा ट्रस्ट निरर्थक होय.

(ब) अ हा, जकातचोरीनें माल नेण्याआणण्याचा धंदा चालविण्यामध्यें लावण्यासाठीं व त्यापासून होणाऱ्या फायद्यांतून अर्चीं मुलें पाळण्यासाठीं, बला मृत्युलेखांत ट्रस्टनें मिळकत देऊन ठेवितो. हा ट्रस्ट निरर्थक होय.

(क) अ हा नादार स्थितींत असतांना, आपल्या हयातीपर्यंत आपल्याकरितां, आणि आपल्या मरणानंतर दकरितां, बला ट्रस्टनें मिळकत तबदील करून देतो. अ नादार ठरतो. अबद्दलचा ट्रस्ट त्याच्या धनकोंच्या संबंधापुरता कायदेशीर होणार नाहीं.

५. स्थावर मिळकतीच्या संबंधाचा कोणताहि ट्रस्ट, तो मृत्युलेखाव्यतिरिक्त लेखानें लेखीं कळविलेला असून त्या लेखावर ट्रस्टच्या कर्त्याची अगर ट्रस्टीची सही झालेली असल्याशिवाय व तो नोंदलेला असल्याशिवाय, किंवा ट्रस्टच्या कर्त्याच्या अगर ट्रस्टीच्या मृत्युलेखानें कळविलेला असल्याशिवाय, कायदेशीर होणार नाहीं. स्थावर मिळकतीचा ट्रस्ट.

जंगम मिळकतीच्या संबंधाचा कोणताहि ट्रस्ट, तो वर सांगितल्याप्रमाणें कळविलेला असल्याशिवाय, किंवा मिळकतीची मालकी ट्रस्टीला तबदील करून दिली असल्याशिवाय, कायदेशीर होणार नाहीं. जंगम मिळकतीचा ट्रस्ट.

जेथें कपट होण्यासारखा या नियमांचा अमल होणारा असेल तेथें ते लागू नाहींत.

६. जेव्हां ट्रस्टचा कर्ता वाजवी निश्चितार्थानें कोणत्याहि शब्दांनीं अथवा कृत्यांनीं (अ) त्यायोगें ट्रस्ट उत्पन्न करण्याचा आपला इरादा, (ब) ट्रस्टचा हेतु, (क) हिताधिकारी, आणि (ड) ट्रस्टची मिळकत हीं दर्शवितो, आणि (ट्रस्ट मृत्युलेखानें कळविलेला नसल्यास अथवा ट्रस्टचा कर्ता स्वतःच ट्रस्टी होणार नसल्यास) ट्रस्टची मिळकत ट्रस्टीला तबदील करून देतो तेव्हां, ५ व्या कलमांतील ठरावांस पात्र राहून, ट्रस्ट उत्पन्न होतो. ट्रस्ट उत्पन्न करणें.

उदाहरणें.

(अ) "ब हा दिलेल्या मिळकतीची कच्या हिताकरितां व्यवस्था करील अशा पूर्ण विश्वासावर" अ, बला अमुक एक मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेवितो. यावरून ब आणि क यांच्या संबंधापुरता ट्रस्ट उत्पन्न होतो.

(ब) "ब हा दिलेली मिळकत कुटुंबांत चालवील अशा आशेवर" अ, बला अमुक एक मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेवितो. यावरून ट्रस्ट

उत्पन्न होत नाहीं, कारण हिताधिकारी वाजवी निश्चितार्थानें दर्शवि-लेला नाहीं.

(क) अ हा बला अमुक एक मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेवून त्यास अशी विनंति करितो कीं तुला कच्या कुटुंबापैकीं जे असामी सर्वांत लायक वाटतील त्यांमध्यें तूं ही मिळकत वांटून द्यावी. यावरून ट्रस्ट उत्पन्न होत नाहीं, कारण हिताधिकारी वाजवी निश्चितार्थानें दर्शविलेले नाहींत.

(ड) अ हा बला अमुक एक मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेऊन त्यास अशी इच्छा दर्शवितो कीं, हिच्यापैकीं मुख्य भाग कच्या मुलांमध्यें तूं वि-भागून द्यावा. यावरून ट्रस्ट उत्पन्न होत नाहीं, कारण ट्रस्टची मिळ-कत वाजवी निश्चितार्थानें दर्शविलेली नाहीं.

(ई) अ हा आपलीं कर्जें बनें फेडावीं व कला एक मृत्युलेखदान द्यावें अशा शर्तीवर त्याला एक दुकान व विकण्यासाठीं ठेवलेला माल मृत्युलेखांत देऊन ठेवितो. ही शर्त झाली, अचे धनकी व क यांकरितां हा ट्रस्ट नव्हे.

कोणाला ट्रस्ट उत्पन्न करितां येतील.

७. ट्रस्ट—

(अ) करार करण्याविषयीं लायक असलेल्या प्रत्येक मनुष्याला, आणि,

(ब) अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाच्या परवानगीनें, अल्पवयी मनुष्याला किंवा त्याच्या तर्फे,

उत्पन्न करतां येईल;

परंतु तो ट्रस्ट ट्रस्टच्या कर्त्याला ट्रस्टच्या मिळकतीची व्यवस्था कोणत्या प्रसंगीं व कितपत लावतां येईल अशा विषयींच्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्यास प्रत्येक बाबतींत पात्र राहील.

ट्रस्टचा विषय.

८. ट्रस्टचा विषय हा, हिताधिकाऱ्यास तबदील करून देतां येण्याजोगी मिळकत असली पाहिजे.

तो चालू असलेल्या एकाद्या ट्रस्टाखालील नुसता हितसंबंध असतां कामा नये.

हिताधिकारी कोण होऊं शकेल.

९. मिळकत धारण करण्याजोगा प्रत्येक मनुष्य हिताधिकारी होऊं शकेल.

हिताधिकाऱ्याकडून हक्कत्याग.

योजिलेल्या हिताधिकाऱ्याला, ट्रस्टअन्वयेंचा आपला हक्कसंबंध, हक्कत्याग करण्या-विषयीं ट्रस्टीला लिहून, किंवा ट्रस्टच्या खबरेनिशीं, त्या हक्कसंबंधाशीं प्रतिकूळ असा हक्क दाखवून, सोडून देतां येईल.

ट्रस्टी कोण होऊं शकेल.

१०. मिळकत धारण करण्याजोगा प्रत्येक मनुष्य ट्रस्टी होऊं शकेल ; परंतु ज्या बाबतींत ट्रस्टमध्यें नजरेस येईल त्याप्रमाणें काम चालविण्याचा अधिकार असेल, त्या बाबतींत तो करार करण्याविषयीं लायक नसल्यास, तो ट्रस्ट बजावूं शकणार नाहीं.

ट्रस्ट पतकरण्याविषयीं कोणी-हि बांधलेला नाहीं.

ट्रस्ट पतकरण्याविषयीं कोणीहि बांधलेला नाहीं.

ट्रस्टचा पतकर.

ट्रस्टीच्या ज्या कोणत्याहि शब्दांवरून अथवा कृत्यांवरून ट्रस्ट पतकरिला असें वाजवी निश्चितार्थानें दर्शविलें जातें त्यांवरून तो पतकरिला असें होतें.

ट्रस्टचा हक्कत्याग.

योजिलेल्या ट्रस्टीला, ट्रस्ट पतकरण्याच्याबदला, त्याचा हक्कत्याग, वाजवी मुदतीच्या आंत, करतां येईल, आणि अशा हक्कत्यागामुळें ट्रस्टची मिळकत त्याजमध्यें निविष्ट होणार नाहीं.

दोन अथवा अधिक सहट्रस्टींतून एकानें हक्कत्याग केला असतां ट्रस्टची मिळकत त्यांपैकीं दुसऱ्यामध्यें अगर दुसऱ्यांमध्यें निविष्ट होते, आणि तो अगर ते ट्रस्टी ट्रस्ट उत्पन्न झाल्या तारखेपासून एकटाच अगर एकटेच ट्रस्टी होतात.

उदाहरणें.

(अ) अ हा आपले मृत्युलेख-चालविणारे ब आणि क यांस ड करतां ट्रस्टी ह्मणून अमुक एक मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेवतो. ब आणि क अचा मृत्युलेख शाबीत करितात. येवढ्यानेंच ट्रस्ट पतकरणें होतें, व ब आणि क हे डकरितां ती मिळकत ट्रस्टनें धारण करतात.

(ब) दिलेली मिळकत विकून जें उत्पन्न होईल त्यांतून आपलीं कर्जें देण्याकरितां अ हा बला ट्रस्टनें अमुक एक मिळकत तबदील करून देतो. ब ट्रस्ट पतकरून ती मिळकत विकतो. बच्या संबंधापुरता, सदरहू उत्पन्नाचा ट्रस्ट अच्या धनकोंकरितां उत्पन्न झाला.

(क) अ हा कांहीं ट्रस्टांवर बला एक लाख रुपये मृत्युलेखांत देऊन ठेवून त्याला आपला मृत्युलेख-चालविणारा नेमितो. ब ते लाख रुपये एकंदर मालमत्तेंतून निराळे काढून तें विशिष्ट हेतूकडे लावितो. हें ट्रस्ट पतकरणें झालें.

---

## बाब ३.

### ट्रस्टींचीं कामें व जबाबदाऱ्या यांविषयीं.

११. ट्रस्टीला, ट्रस्टचा हेतु आणि ट्रस्ट उत्पन्न करते वेळीं त्याच्या कर्त्यानें सांगितलेल्या आज्ञा यांमध्यें सर्व हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असून त्या सर्वांच्या संमतीनें केलेला फेरफार खेरीज करून, तो हेतु पुरा करणें व त्या आज्ञा पाळणें हें भाग आहे. ट्रस्टीनें ट्रस्ट बजावणें.

हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक नसेल तेव्हां, त्याची संमति, या कलमाच्या कारणांकरितां, अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाला देतां येईल.

जेव्हां कोणतीही आज्ञा पाळणें अशक्य असेल, गैरकायदेशीर असेल अथवा हिताधिकाऱ्यांला उघडपणें नुकसानकारक असेल तेव्हां, या कलमांतील कोणत्याहि मजकुरावरून, ट्रस्टीनें ती पाळणें जरूर आहे असें समजूं नये.

खुलासा.—उलट इरादा दर्शविलेला नसेल तर, कर्जाच्या फेडीबद्दलच्या ट्रस्टचा हेतु (अ) ट्रस्टच्या कर्त्यांचीं जीं कर्जें ट्रस्टच्या लेखाच्या तारखेस अथवा असा लेख मृत्युलेख असेल तेव्हां त्याच्या मरणाच्या तारखेस असून वसूल होण्याजोगीं असतील तेवढींच कर्जें फेडणें, आणि (ब) विनव्याजी कर्जांच्या बाबतींत, तीं व्याजावांचून फेडणें, हा आहे असें समजलें पाहिजे.

उदाहरणें.

(अ) अ ह्या ट्रस्टीला अमुक एक जमीन जाहीर लिलांवानें विकावी असा नुसता अखत्यार दिलेला आहे. ही जमीन त्याला खासगी करारानें विकतां यावयाची नाहीं.

(ब) क्ष, य आणि ज्ञ यांच्याकरितां असणारा अमुक जमिनीचा ट्रस्टी अ याला ती जमीन बस अमुक रकमेला विकावी असा अखत्यार दिलेला आहे. क्ष, य व ज्ञ हे करार करण्यास लायक असून, अनें वाटेल तर ती जमीन कला कमी रकमेला विकावी अशी संमति देतात, अला ती जमीन त्याप्रमाणें विकतां येईल.

(क) ब व तिची मुलें यांच्याकरितां असणारा ट्रस्टी अ याला ट्रस्टच्या कर्त्यांचें सांगणें आहे कीं तूं बच्या विनंतीवरून, तिचा नवरा क यास, त्याच्या खताच्या तारणावर, ट्रस्टची मिळकत उसनी द्यावी. क नादार होतो, आणि ब ती मिळकत उसनी देण्याविषयीं अला विनंति करते. अला ती उसनी देण्याचें नाकारतां येईल.

ट्रस्टीनें ट्रस्टच्या मिळकतीच्या स्थितीविषयीं माहिती करून घेणें.

१२. ट्रस्टीला, होईल तितक्या लवकर, ट्रस्टच्या मिळकतीचें स्वरूप आणि हकीकत यांची माहिती करून घेणें; जरूर असेल त्या प्रसंगीं ट्रस्टची मिळकत आपल्या नांवावर तबदील करून घेणें; आणि (ट्रस्टच्या लेखांतील ठरावांस पात्र राहून) अपुऱ्या अथवा धोक्याच्या तारणावर लावलेला ट्रस्टाचा पैसा काढून घेणें, हें भाग आहे.

उदाहरणें.

(अ) ट्रस्टची मिळकत ही आंगउधार दिलेलें कर्ज आहे. ट्रस्टच्या लेखांत ट्रस्टीला, तें कर्ज तसें राहूं देण्याविषयीं अधिकार दिलेला नाहीं. तें कर्ज विनाकारण विलंब न लावतां वसूल करणें हें ट्रस्टीचें काम आहे.

(ब) ट्रस्टची मिळकत पैसा असून तो दोघां सहट्रस्टींपैकीं एकाच्या हातीं आहे. ट्रस्टच्या लेखांत नजरेस येईल त्याप्रमाणें वागण्याचा अधिकार दिलेला नाहीं. दुसऱ्या सहट्रस्टीनें तो पैसा प्रकरणाच्या हकीकतीप्रमाणें जरूर असेल त्यापेक्षां अधिक वेळ पहिल्या सहट्रस्टीकडे राहूं देतां कामा नये.

ट्रस्टच्या मिळकतीवरील सत्ताधिकार ट्रस्टीनें संभाळणें.

१३. ट्रस्टीला, ट्रस्टच्या मिळकतीच्या स्वरूपाकडे व तिची रकम किंवा किंमत हिच्याकडे लक्ष्य देऊन, ट्रस्टच्या मिळकतीचें संरक्षण करण्याला व तिच्यावरील सत्ताधिकार [टायटल] स्थापन करण्याला अगर संभाळण्याला वाजवी रीतीनें जरूर असतील तसे सर्व दावे चालविणें व त्यांमध्यें जाब देणें, आणि (ट्रस्टच्या लेखांतील ठरावांस पात्र राहून) तशी इतर तजवीज करणें हें भाग आहे.

उदाहरण.

ट्रस्टची मिळकत स्थावर असून विननोंदलेल्या लेखानें ती ट्रस्टच्या कर्त्याला दिलेली आहे. सन १८७७ चा हिंदुस्थानचा नोंदण्याचा आक्ट यांतील ठरावांस पात्र राहून, तो लेख नोंदविणें हें ट्रस्टीचें कर्तव्य आहे.

ट्रस्टीनें, हिताधिकाऱ्याला प्रतिकूळ असा सत्ताधिकाराविषयीं हक्क सांगतां कामा नये.

१४. ट्रस्टीनें, हिताधिकाऱ्याच्या हक्कसंबंधाला प्रतिकूळ असा कोणताहि सत्ताधिकाराविषयीं हक्क ट्रस्टच्या मिळकतीवर स्वतःकरितां अथवा दुसऱ्या मनुष्याकरितां सांगतां कामा नये अगर अशा हक्कास पुष्टि देतां कामा नये.

ट्रस्टीनें काळजी घेणें जरूर आहे.

१५. ट्रस्टीला, ट्रस्टची मिळकत साधारण समजुतीच्या एकाद्या मनुष्याची स्वतःची असती तर जशा काळजीनें तो तिच्या संबंधानें वागता तशा काळजीनें अशा मिळकतीच्या संबंधानें वागणें भाग आहे, आणि उलट करार नसेल तेव्हां, याप्रमाणें वागणारा ट्रस्टी, ट्रस्टमिळकत नाहींशी झाली, नाश पावली अथवा बिघडली असतां त्याबद्दल जबाबदार होत नाहीं.

उदाहरणें.

(अ) कलकत्यास राहणारा अ, मुंबईस राहणाऱ्या ब करितां ट्रस्टी आहे. अ हा, ट्रस्टी या नात्यानें आपल्याकरितां एका चोख साखीच्या मनुष्यानें लिहिलेल्या व मुंबईस पैसा मिळे अशा प्रकारच्या हुंड्यांच्या योगें बला ट्रस्टचा पैसा पाठवितो. सदर्हू हुंड्या नकारल्या जातात. झालेलें नुकसान भरून देणें अला भाग नाहीं.

(ब) अ हा पट्ट्यानें धारण केलेल्या मिळकतीचा ट्रस्टी असून, तिचें भाडें त्या वेळीं साख असलेल्या ब पेढीवाल्याकडे ट्रस्टच्या खातीं देण्याविषयीं कुळास सांगतो. त्याप्रमाणें बकडे तें भाडें दिलें जातें, आणि त्या पैशाची गरज लागे तोंपर्यंतच अ तो पैसा बजवळ राहूं देतो. पैसा काढून घेण्यापूर्वी ब नादार होतो. ब नादार स्थितीमध्यें होता असें वाटण्यास अला कांहींच कारण नव्हतें, म्हणून झालेलें नुकसान भरून देणें अला भाग नाहीं.

(क) अ हा बकरितां दोन कर्जांचा ट्रस्टी असून, त्यांतून एक सोडून देऊन दुसऱ्याविषयीं तोडजोड केली असतां बचें हित आहे असें खऱ्या भावानें व वाजवी रीतीनें वाटून, तो तसें करितो. यामुळें बस झालेलें कोणतेंही नुकसान भरून देणें अला भाग नाहीं.

(ड) अ ह्या ट्रस्टीस ट्रस्टची मिळकत लिलावानें विकण्याविषयीं सांगितलें असून, तो ती विकतो, परंतु अशी विक्री आहे असें लोकांस जाहीर करीत नाहीं व ते येऊन एकमेकांवर चढ टाकून मागतील अशी तजवीज करण्याविषयीं इतर रीतीनें त्याकडून वाजवी तत्परता होत नाहीं. यामुळें हिताधिकाऱ्याला झालेलें नुकसान भरून देणें अला भाग आहे.

(इ) अ हा बकरितां ट्रस्टी असून, आपल्या ट्रस्टच्या बजावणींत ट्रस्टची मिळकत विकतो, परंतु त्याच्याकडून योग्य तत्परता न झाल्या कारणानें विक्रीच्या पैशांपैकीं कांहीं भाग त्याला येत नाहीं. यामुळें बला झालेलें नुकसान भरून देणें अला भाग आहे.

(फ) अ हा विम्याच्या पॉलिसीचा बकरितां ट्रस्टी असून, तिजबद्दल प्रीमियम भरण्याकरितां त्याच्या हातांत पैसा आहे. अ प्रीमियम भरण्याची हयगय करितो, आणि त्यामुळें सदर्हू पॉलिसी बुडते. अला बचें नुकसान भरून देणें भाग आहे.

(ग) अ हा, ब आणि क यांला ट्रस्टी या नात्यानें कांहीं पैसा मृत्युलेखांत देऊन ठेवून, आपण स्वतः ज्या पेढीवर ट्रस्टचा पैसा ठेविला होता त्या पेढीवर आंगउधार तो चालू ठेवावा असा त्यांस अधिकार देतो. अ मरतो, आणि पेढीमध्यें फेरफार होतो. ब आणि क यांनीं सदर्हू पैसा ह्या नव्या पेढीवर आंगउधार राहूं देतां कामा नये.

(ह) अ हा बकरितां ट्रस्टी असून, आपला सहट्रस्टी क याला एकट्यालाच ट्रस्ट बजावूं देतो. क ट्रस्टची मिळकत भलत्याच कामीं लावतो. यामुळें बला होणाऱ्या नुकसानाबद्दल अ जातीनें जबाबदार आहे.

१६. जेव्हां एका मागून एक अशा अनेक मनुष्यांच्या हिताकरितां ट्रस्ट उत्पन्न केलेला असेल, आणि ट्रस्टची मिळकत खराब होण्याजोगी असेल अथवा भावी अथवा अन्यभोगोत्तरप्राप्य हक्कसंबंध असेल तेव्हां, ट्रस्टच्या लेखावरून उलट इरादा असल्याचें अनुमान निघत नसल्यास, अशी मिळकत बदलून कायमच्या व लगेच फायदेशीर होणाऱ्या प्रकारची मिळकत करणें ट्रस्टीला भाग आहे. नाश होण्याजोग्या मिळकतीचें रूपांतर.

उदाहरणें.

(अ) अ हा आपली सर्व मिळकत कच्या हयातीपर्यंत त्याकरितां, व त्याच्या मरणानंतर डकरितां व डच्या मरणानंतर ईकरितां ट्रस्टनें बला आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवितो. अची मिळकत ही पट्ट्यानें धारण केलेलीं तीन घरें असून, उपभोग घ्यावयाचा तो त्या घरांचाच घेतला

पाहिजे असा त्याचा इरादा होता असें दिसण्याला अच्या मृत्युलेखांत कांहीं आधार नाहीं. बनें तीं घरें विकून उत्पन्न झालेला पैसा विसाव्या कलमाबरहुकुम लावावा.

(ब) अ हा, कच्या हयातीपर्यंत त्याकरितां, व त्याच्या मरणानंतर डकरितां व डच्या मरणानंतर ईकरितां कलकत्यांत असलेलीं पट्टयानें धारण केलेलीं आपलीं तीन घरें व त्यांतील सर्व सामान ट्रस्टनें बला आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवितो. येथें त्या घरांचाच त्यांमधील सामानासह उपभोग घेतला पाहिजे असा इरादा स्पष्ट दिसून येतो. ह्मणून बनें तीं विकूं नयेत.

ट्रस्टीनें निष्पक्षपाती असणें.

१७. एकापेक्षां अधिक हिताधिकारी असतील तेव्हां ट्रस्टीला निष्पक्षपातानें वागणें भाग आहे, आणि एकाचें नुकसान करून दुसऱ्याचा फायदा करण्याकरितां ट्रस्ट बजावतां कामा नये.

ट्रस्टीला आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें वागण्याचा अधिकार असेल तेव्हां, वाजवी रीतीनें व खऱ्या भावानें तो अधिकार चालविला असतां त्यावर निर्बंध ठेवण्याचा अधिकार या कलमांतलि कोणत्याहि गोष्टीवरून कोर्टाला मिळतो असें समजूं नये.

उदाहरण.

अ हा ब, क व ड यांकरितां ट्रस्टी असून, ट्रस्टची मिळकत लावण्याच्या निर्दिष्ट केलेल्या अनेक रीतींतून त्याला कोणतीहि पसंत करण्याचा अधिकार दिला आहे. अ खऱ्या भावानें अशा रीतींतून एक रीत पसंत करितो. अशा पसंतीपासून ब, क व ड यांच्या परस्पर हक्कांमध्यें फेरफार झाला तरी कोर्ट अशा बाबतींत हात घालणार नाहीं.

ट्रस्टीनें खराबी होऊं न देणें.

१८. एकामागून एक अशा अनेक मनुष्यांच्या हितासाठीं ट्रस्ट उत्पन्न केलेला असून त्यांपैकीं एकाच्या कबज्यांत ट्रस्टची मिळकत असेल तेव्हां, तीस नाशकारक अथवा कायमचें नुकसानकारक असें कोणतेंही कृत्य जर तो करील अगर करण्याची भीति घालील, तर असें कृत्य न होऊं देण्याविषयीं तजवीज करणें ट्रस्टीला भाग आहे.

हिशोब व माहिती.

१९. ट्रस्टीला (अ) ट्रस्टच्या मिळकतीचे स्पष्ट व बरोबर हिशोब ठेवणें, आणि (ब), सर्व वाजवी वेळीं, हिताधिकाऱ्याच्या मागणीवरून, ट्रस्टची मिळकत किती आहे व तिची स्थिति कशी आहे याविषयीं त्याला पूर्ण व बरोबर माहिती देणें भाग आहे.

ट्रस्टचा पैसा लावणें.

२०. ट्रस्टची मिळकत पैसा असून तो लागलाच अथवा लवकर ट्रस्टच्या हेतूंकडे लावतां येत नसेल तेव्हां, ट्रस्टीला (ट्रस्टच्या लेखामध्यें कोणतीहि आज्ञा असल्यास तिला पात्र राहून) तो पैसा खालीं सांगितलेल्या सिक्यूरिटींवर लावणें भाग असून, त्यानें तो दुसऱ्या कोणत्याहि सिक्यूरिटींवर लावतां कामा नयेः—

(अ) हिंदुस्तान सरकारच्या किंवा ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या प्रॉमिसरी नोटी, डिबेंचर, स्टॉक अथवा इतर सिक्यूरिटी, यांमध्यें ;

(ब) हिंदुस्तानच्या महसुलावर बादशाही पार्लमेंटानें ज्यांचा बोजा ठेवला आहे असे बांड, डिबेंचर व आन्युइटी, यांमध्यें ;

(क) सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांनीं, रेल्वे अथवा इतर कंपन्यांच्या ज्या स्टॉकवरील, डिबेंचरांवरील अथवा शेअरांवरील व्याजाचा जिम्मा घेतला असेल असा स्टॉक, डिबेंचर किंवा शेअर, यांमध्यें ;

(ड) ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें स्थापलेल्या कोणत्याहि कायदे करणाऱ्या मंडळीच्या कोणत्याही आक्टावरून दिलेल्या अधिकाराअन्वयें कोणत्याहि म्युनिसिपालिटीच्या मंडळीनें अथवा अशा मंडळीच्या तर्फे काढिलेले डिबेंचर अगर पैशाबदलच्या इतर सिक्यूरिटी, यांमध्यें;

(ई) ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें असलेल्या स्थावर मिळकतीच्या पहिल्या गहाणावर: मात्र ती मिळकत कांहीं वर्षांच्या मुदतीनें पट्टयानें धारण केलेली मिळकत असता कामा नये, व तिची किंमत गहाणाचे पैशापेक्षां एक-तृतीयांशानें, अथवा ती इमारती असल्यास, एक-द्वितीयांशानें जास्त असली पाहिजे; अथवा

(फ) ट्रस्टच्या लेखामध्यें अगर या बाबतींत हाय् कोर्ट वेळोवेळीं ठरवील तशा कोणत्याही नियमामध्यें स्पष्टपणें अधिकार दिलेल्या इतर कोणत्याहि सिक्यूरिटीवर:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कोणी मनुष्य करार करण्याविषयीं लायक असून ट्रस्टची मिळकत कबज्यांत असतां तिचें उत्पन्न आपल्या हयातीपर्यंत, अथवा त्याहून जास्त हक्कसंबंधापर्यंत घेण्याचा त्याला हक्क असेल, तेव्हां (ड), (ई) व (फ) या रकमांत सांगितलेल्या अथवा उल्लेख केलेल्या कोणत्याहि सिक्यूरिटीवर त्याच्या लेखी संमतीवांचून पैसा लावू नये.

२१. कलम वीस यांतील कोणताही मजकूर, हा आक्ट अमलांत येण्यापूर्वीं लावलेल्या पैशाला लागू होणार नाहीं, किंवा त्यावरून सन १८७१ चा जमिनीच्या सुधारणुकेचा आक्ट याअन्वयें अगाऊ दिलेल्या पैशाबदल तारण ह्मणून अगोदर लावून दिलेल्या स्थावर मिळकतीच्या गहाणावर पैसा लावण्याची, अथवा ट्रस्टचा पैसा तीन हजार रुपयांहून जास्त नसेल, तर तो सरकारी सेविंग ब्यांकेमध्यें ठेवण्याची बंदी होईल असें समजूं नये. — जमिनीचा सुधारणुकेचा आक्ट याअन्वयें सरकारास लावून दिलेल्या जमिनीचें गहाण. — सरकारी सेविंग ब्यांकेमध्यें पैसा ठेवणें.

२२. निर्दिष्ट केलेल्या वेळाच्या आंत विक्री करण्याविषयीं ट्रस्टीला सांगितलेलें असून, तो वेळ तो लांबवील तेव्हां, याप्रमाणें ती लांबविण्याविषयीं अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टानें अधिकार दिलेला नसेल तर, तो लांबविल्यानें हिताधिकाऱ्याचें नुकसान झालें नाहीं असें, तो व हिताधिकारी यांच्या दर्म्यान, शाबीत करण्याचा बोजा ट्रस्टीवर आहे. — निर्दिष्ट केलेल्या वेळाच्या आंत विकण्याविषयीं ज्या ट्रस्टीला सांगितलेलें असेल त्याकडून विक्री.

### उदाहरण.

अ हा ब्ला आपल्या मृत्युलेखांत मिळकत देऊन ठेवतो, आणि ती होईल तितक्या सोईवार त्वरेनें पांच वर्षांचे आंत विकावी व उत्पन्न होणारा पैसा कच्या हिताकडे लावावा असें त्याला सांगतो. ब वाजवी रीतीनें नजर चालवून ती विक्री सहा वर्षेपर्यंत तहकूब ठेवितो. यावरून अशी विक्री गैरकायदेशीर होत नाहीं, परंतु क अशा तहकुबीपासून आपलें नुकसान झालें असें ह्मणून त्याचा मोबदला मिळण्याबदल बवर दावा मांडतो. अशा दाव्यांत, कचें नुकसान झालेलें नाहीं असें शाबीत करण्याचा बोजा बवर आहे.

२३. ट्रस्टी विश्वासघात करील तेव्हां, तो करण्याविषयीं ट्रस्टीला हिताधिकाऱ्यानें कपटानें प्रवृत्त केलेलें नसेल, अथवा हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असून तो स्वतः, सख्ती अगर अयोग्य दाब त्याच्यावर चालविण्यांत न येतां, त्या प्रकरणाची व ट्रस्टीवर, जे आपले हक्क त्यांची पूर्ण माहिती असून, त्या विश्वासघातामध्यें सामील झाला असें किंवा त्या विश्वासघाताला तो मागून राजी झाला असें नसेल, तर अशा विश्वासघाता- — विश्वासघाताबदल जबाबदारी.

पासून ट्रस्टच्या मिळकतीला किंवा हिताधिकाऱ्याला जी नुकसानी पोहंचली असेल ती भरून देण्याला तो ट्रस्टी पात्र आहे.

विश्वासघात करणारा ट्रस्टी व्याज देण्यास पात्र नाहीं; मात्र खालील बाबतींमध्यें तो पात्र आहे:—

(अ) त्यानें खरोखर व्याज घेतलेलें असेल तेव्हां:

(ब) हिताधिकाऱ्याला ट्रस्टचा पैसा देण्यामध्यें गैरवाजवी विलंब लावून विश्वासघात केला असेल तेव्हां:

(क) ट्रस्टीनें व्याज घ्यावयास पाहिजे होतें परंतु त्यानें तें घेतलें नसेल तेव्हां:

(ड) त्यानें व्याज घेतलें आहे असें योग्य रीतीनें ग्रहण करतां येईल तेव्हां:

तो, (अ) बाबतीमध्यें, खरोखर घेतलेल्या व्याजाबद्दल हिशोब देण्यास, व (ब), (क), व (ड) ह्या बाबतींमध्यें, कोर्टानें इतर रीतीनें फर्माविलें नाहीं तर, दरसाल दरशेंकडा सहा टक्कयांच्या दरानें सरळ व्याजाबद्दल हिशोब देण्यास पात्र आहे.

(इ) ट्रस्टचा पैसा लावण्यास व त्यावरील व्याज अगर डिविडेंड जमूं देण्यास चुकून विश्वासघात केला असेल तेव्हां तो, त्याच दरानें (सहामाही मुदती धरून) चक्रवाढ व्याजाबद्दल हिशोब देण्यास पात्र आहे.

(फ) ट्रस्टची मिळकत अगर तिचें उत्पन्न व्यापारांत अगर धंद्यांत घालून विश्वासघात केला असेल तेव्हां तो, हिताधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणें, त्याच दरानें (सहामाही मुदती धरून) चक्रवाढ व्याजाबद्दल, अथवा सदरहू मिळकत किंवा उत्पन्न याप्रमाणें लावल्यानें झालेल्या नक्की नफ्याबद्दल हिशोब देण्यास पात्र आहे.

## उदाहरणें.

(अ) एक ट्रस्टी ट्रस्टची मिळकत उगवण्याची अयोग्य रीतीनें राहूं देतो, आणि त्यामुळें ती बुडते: बुडालेली मिळकत भरून देण्याला तो पात्र आहे, परंतु तिजवर व्याज देण्याला तो पात्र नाहीं.

(ब) एक घर विकून उत्पन्न होणारा पैसा कला देण्याकरितां तें ट्रस्टनें अ हा बला आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवितो. ब तें घर विकण्याची फार वेळपर्यंत हयगई करितो, आणि त्यामुळें घर खराब होऊन त्याची बाजारकिंमत उतरते. ब हा कला नुकसानीबद्दल जबाबदार आहे.

(क) एक ट्रस्टी, ट्रस्टचा पैसा कलम वीस याअन्वयें लावण्यामध्यें, अथवा तो हिताधिकाऱ्याला देण्यामध्यें गैरवाजवी विलंब करण्याबद्दल अपराधी आहे. तो ट्रस्टी त्या पैशावर अशा विलंबाच्या मुदतीबद्दलचें व्याज देण्यास पात्र आहे.

(ड) विसाव्या कलमाच्या (अ), (ब), (क), अगर (ड) या रकमेंत सांगितलेल्या सिक्यूरिटींपैकीं कोणत्याहि सिक्युरिटीमध्यें ट्रस्टचा पैसा लावणें हें ट्रस्टीचें काम आहे. तसें न करतां, तो हा पैसा आपल्या हातांत ठेवितो. हिताधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणें, मुद्दल पैसा व व्याज यांची रकम, किंवा सदरहू ट्रस्टचा पैसा लावावयास पाहिजे होता त्या वेळीं त्या पैशानें ज्या सिक्यूरिटी त्यास विकत घेतां आल्या असत्या त्यांची रकम व त्यांवरील दर्म्यानचे डिविडेंड व व्याज हीं त्याच्यावर लादलीं जाण्यास तो पात्र आहे.

(इ) ट्रस्टच्या लेखामध्यें ट्रस्टीला, ट्रस्टचा पैसा, अशा कोणत्याही सिक्यु-रिटींमध्यें किंवा स्थावर मिळकतीच्या गहाणावर लावावा असें सांगितलें आहे. ट्रस्टी यांपैकीं कोणतेंच करीत नाहीं. मुदल पैसा व व्याज देण्याला तो पात्र आहे.

(फ) ट्रस्टच्या लेखामध्यें ट्रस्टीला, अशा कोणत्याहि सिक्युरिटींमध्यें ट्रस्टचा पैसा लावून त्यांवरील डिविडेंड जमूं देण्याविषयीं सांगितलेलें आहे. ट्रस्टी या सांगण्याकडे दुर्लक्ष करितो. हिताधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणें, मुदल पैसा व चक्रवाढ व्याज यांची रकम, किंवा सदहू ट्रस्टचा पैसा लावावयास पाहिजे होता त्या वेळीं त्या पैशानें ज्या सिक्यूरिटी त्यास विकत घेतां आल्या असत्या त्यांची रकम, व दर्म्यानचे डिविडेंड योग्य रीतीनें लावले असते तर त्यांपासून जमली असती ती रकम, ह्या त्याच्यावर लादल्या जाण्यास तो पात्र आहे.

(ग) विसाव्या कलमाच्या (अ), (ब), (क) अथवा (ड) या रकमेंत सांगितलेल्या सिक्यूरिटींपैकीं एकीमध्यें ट्रस्टची मिळकत लावलेली आहे. ट्रस्टच्या लेखांतील शर्तींवरून ज्याविषयीं अधिकार दिलेला नाहीं अशा एकाद्या हेतूकरितां ट्रस्टी ती सिक्यूरिटी विकतो. तो, हिताधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणें, त्या सिक्यूरिटीवरील दर्म्यानचे डिविडेंड व व्याज यांसह तिच्या ऐवजीं सिक्युरिटी देण्यास, किंवा विक्रीचें उत्पन्न व त्यावरील व्याज यांबदल हिशोब देण्यास पात्र आहे.

(ह) ट्रस्टची मिळकत जमीन आहे. ट्रस्टी ती जमीन एका खरीददाराला, ट्रस्टची खबर नसतां, मोबदला घेऊन विकतो. तो, हिताधिकाऱ्याच्या मर्जीप्रमाणें, तशाच ट्रस्टवर ठेवण्याकरितां तितक्याच किंमतीची दुसरी जमीन खरीद करण्याला, किंवा विक्रीचें उत्पन्न सव्याज त्याच्यावर लादलें जाण्याला पात्र आहे.

ट्रस्टीला वजावाट करण्याचा मोकळीक नाहीं.

२४. ट्रस्टच्या मिळकतीच्या एका अंशाच्या संबंधानें केलेल्या विश्वासघातामुळें झालेलें नुकसान भरून देण्यास पात्र असलेल्या ट्रस्टीला, याप्रमाणें तो पात्र असलेल्या नुकसानाची, व दुसऱ्या एका भिन्न विश्वासघातामुळें ट्रस्टच्या मिळकतीच्या दुसऱ्या अंशाच्या संबंधानें झालेल्या लाभाची वजावाट करितां येणार नाहीं.

अगोदरच्या ट्रस्टीच्या कसुरीबदल जबाबदारी नाहीं.

२५. एका ट्रस्टीच्या जागीं दुसरा ट्रस्टी येईल तेव्हां तो, ट्रस्टीच्या नात्यानें, आपल्या अगोदरच्या ट्रस्टीच्या कृत्यांबदल अगर कसूरींबदल जबाबदार नाहीं.

सहट्रस्टीच्या कसुरीबदल जबाबदारी नाहीं.

२६. तेराव्या व पंधराव्या कलमांतील ठरावांस पात्र राहून, एक ट्रस्टी, ट्रस्टीच्या नात्यानें, आपल्या सहट्रस्टीनें केलेल्या विश्वासघातावदल जबाबदार नाहीं:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ट्रस्टच्या लेखामध्यें उलट इरादा स्पष्ट कळविलेला नसेल तर, ट्रस्टी खालील बाबतींमध्यें याप्रमाणें जबाबदार आहे, ह्मणजे—

(अ) ट्रस्टची मिळकत योग्य कामीं तो लावतो न लावतो हें न पाहतां ती त्यानें आपल्या सहट्रस्टीच्या स्वाधीन केली असेल तेव्हां:

(ब) ट्रस्टची मिळकत आपल्या सहट्रस्टीला घेऊं देऊन तिच्या संबंधानें तो कसा वागतो ह्याविषयीं योग्य चौकशी करण्यास तो चुकेल, अथवा प्रकरणाच्या हकीकतीवरून वाजवी रीतीनें जरूर असेल त्याहून जास्त वेळपर्यंत त्याच्याजवळ ती राहूं देईल तेव्हां:

(क) आपल्या सहट्रस्टीनें केलेला अगर करावयाचा योजिलेला विश्वासघात आपणाला समजला असून, तो आपण झटून छपवील

अथवा हिताधिकाऱ्याचा हक्कसंबंध संभाळण्याची बाजवी वेळाचे आंत योग्य तजवीज न करील तेव्हां.

पावती देण्यामध्यें अनुकूलतेसाठीं सामील होणें.

कोणी सहट्रस्टी ट्रस्टच्या मिळकतीच्या पावतीवर सही करण्यामध्यें सामील झालेला असून ती मिळकत आपण घेतली नाहीं असें शाबीत करील, तर तो फक्त अशा सहीच्याच कारणावरून, आपल्या सहट्रस्टीकडून होणारें त्या मिळकतीचें नुकसान किंवा दुर्विनियोग याबद्दल जबाबदार होत नाहीं.

उदाहरण.

अ हा अमुक एक मिळकत ब व क यांना आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवून, ती विकून उत्पन्न होईल तें ड च्या हिताकरितां लावण्याविषयीं त्यांस सांगतो. ब व क त्याप्रमाणें ती मिळकत विकतात, आणि विक्रीचा पैसा ब घेऊन आपल्या हातांत ठेवितो. दोन वर्षेपर्यंत क त्या गोष्टीकडे लक्ष्य देत नाहीं आणि त्यानंतर बला सदरीं सांगितल्याप्रमाणें पैसा लावण्याविषयीं सांगतो. ब तसें करण्यास असमर्थ असून तो नादार होतो, आणि तो विक्रीचा पैसा बुडतो. ती रकम भरून देण्यास कला भाग पाडतां येईल.

सहट्रस्टींची वेगवेगळी जबाबदारी.

२७. सहट्रस्टी एकत्र मिळून विश्वासघात करितील, अथवा त्यांतून एकाच्या हयगईमुळें दुसऱ्यास विश्वासघात करावयास मिळेल तेव्हां, अशा विश्वासघातानें झालेल्या सगळ्या नुकसानाबद्दल हिताधिकाऱ्याला त्यांतून प्रत्येकजण जबाबदार आहे.

सहट्रस्टींमध्यें हिसेरसी.

परंतु स्वतः ट्रस्टींमध्यें म्हटलें म्हणजे, त्यांतून एक दुसऱ्यापेक्षां कमी अपराधी असून झालेलें नुकसान त्यास भरून द्यावें लागलें असलें तर त्याला, अशा दुसऱ्या ट्रस्टीस अथवा त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीस जी कांहीं मालमत्ता मिळाली असेल तितक्यापुरतें त्यास सदर्हू नुकसान भरून देण्यास भाग पाडतां येईल; आणि सर्वच सारखे अपराधी असल्यास, ट्रस्टींपैकीं ज्या कोणत्याही एकजणाला अगर अधिकांला तें नुकसान भरून द्यावें लागलें असेल त्याला अथवा त्यांला, हिसेरसी देण्याविषयीं इतरांस भाग पाडतां येईल.

कपट केल्याविषयीं अपराधी असलेल्या ट्रस्टीला, या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून हिसेरसी देण्याविषयीं कोणास भाग पाडण्याबद्दल दावा मांडण्याचा अधिकार मिळतो असें समजूं नये.

हिताधिकाऱ्यानें केलेल्या तबदिलीची खबर नसून अदा करणारा ट्रस्टी जबाबदार नाहीं.

२८. जेव्हां कोणत्याहि हिताधिकाऱ्याचा हक्कसंबंध दुसऱ्या मनुष्यामध्यें निविष्ट होईल, व याप्रमाणें निविष्ट झाल्याची खबर नसून ट्रस्टी, याप्रमाणें तो हक्कसंबंध निविष्ट झाला नसता तर ज्या मनुष्याला ट्रस्टची मिळकत मिळण्याचा हक्क असता त्या मनुष्यास ती अदा करील अथवा त्याच्या स्वाधीन करील, तेव्हां याप्रमाणें अदा केलेल्या अथवा स्वाधीन केलेल्या मिळकतीबद्दल तो ट्रस्टी जबाबदार नाहीं.

हिताधिकाऱ्याचा हक्कसंबंध सरकाराकडे गुन्हेगारीदाखल जाईल तेव्हां ट्रस्टीची जबाबदारी.

२९. हिताधिकाऱ्याचा हक्कसंबंध सरकाराकडे गुन्हेगारीदाखल जाईल अथवा तो कायदेशीर ठरावानें सरकारास देववला जाईल तेव्हां, ट्रस्टची मिळकत अशा हक्कसंबंधापुरती या प्रकरणीं सरकार फर्मावील त्या रीतीनें व त्या मनुष्याच्या हिताकरितां धारण करणें ट्रस्टीला भाग आहे.

ट्रस्टीला नुकसानापासून अभय.

३०. जो पैसा, स्टाक, फंड व सिक्यूरिटी हीं ज्या ज्या ट्रस्टीला खरोखर पोहंचलीं असतील तो तो ट्रस्टी फक्त त्याबद्दल, ट्रस्टच्या लेखांतील आणि कलमें २३ व २६ यांतील ठरावांस पात्र राहून, जबाबदार होईल, पण त्यांपैकीं एकजण दुसऱ्या कोणाकरितां जबाबदार होणार नाहीं, तसेंच ते, ज्या कोणत्याही पेढीवाल्याच्या, दलालाच्या अगर इतर मनुष्याच्या हातीं कोणतीही ट्रस्टची मिळकत दिली असेल त्याबद्दल, व तसेंच कोणताही स्टॉक, फंड अगर सिक्युरिटी अपुरत्या असल्याबद्दल अथवा कमती झाल्याबद्दल व त्यांच्या अनिच्छाधीन नाशाबद्दल ते जबाबदार होणार नाहींत.

## बाब ४.

### ट्रस्टींचे हक्क व अधिकार यांविषयीं.

३१. ट्रस्टचा लेख व केवळ ट्रस्टच्या मिळकतीच्या संबंधाचे सत्ताधिकाराचे कांहीं दस्तऐवज असल्यास ते सर्व आपल्या कबज्यांत घेऊन ठेवण्याचा ट्रस्टीला हक्क आहे. सत्ताधिकाराच्या खतांवर हक्क.

३२. प्रत्येक ट्रस्टीला, ट्रस्टच्या बजावणीमध्यें अगर तिजविषयीं, किंवा ट्रस्टच्या मिळकतीची वसुलात, सांभाळ अगर हित अथवा हिताधिकाऱ्याचें संरक्षण अगर पोषण यांमध्यें अगर यांविषयीं योग्य रीतीनें झालेला सर्व खर्च ट्रस्टच्या मिळकतींतून भरून घेतां, किंवा अदा करतां किंवा देतां येईल. खर्च भरून घेण्याचा हक्क.

जर तो असा खर्च आपल्या पदरच्या पैशांतून करील तर, तो खर्च व त्यावरील व्याज यांबद्दल ट्रस्टच्या मिळकतीवर त्याचा पहिला बोजा राहील; परंतु असा बोजा (अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाच्या मंजुरीनें तो खर्च केला नसेल तर) असा खर्च व व्याज अगोदर दिल्यावांचून ट्रस्टच्या मिळकतीची कोणतीही व्यवस्था करण्याची मनाई करूनच केवळ बजावला पाहिजे.

असा खर्च ट्रस्टच्या मिळकतींतून न मिळाला तर, ट्रस्टीनें ज्या हिताधिकाऱ्याच्या तर्फे काम केलें असेल, व ज्याच्या स्पष्ट अगर गर्भित विनंतीवरून त्यानें सदर्हू पैसा अदा केला असेल त्याकडून खुद्द, अशा खर्चाची रकम वसूल करण्याचा त्याला हक्क आहे.

ट्रस्टीनें हिताधिकाऱ्याला चुकीनें अधिक पैसा दिला असेल तेव्हां त्याला, हिताधिकाऱ्याच्या हक्कसंबंधांतून ट्रस्टच्या मिळकतीची भरपाई करतां येईल. अशा हक्कसंबंधांतून ही भरपाई होत नसल्यास, अशी अधिक दिलेली रकम खुद्द हिताधिकाऱ्यापासून वसूल करण्याचा ट्रस्टीला हक्क आहे. चुकीनें अधिक पैसा दिला असतां तो परत मिळण्याचा हक्क.

३३. ट्रस्टीखेरीज जो कोणी इतर मनुष्य विश्वासघातापासून फायदा करून घेईल त्यानें, अशा विश्वासघातापासून आपणास खरोखर मिळालेल्या रकमेइतकी ट्रस्टीला नुकसानी भरून दिली पाहिजे; आणि असा मनुष्य हिताधिकारी असेल तेव्हां, अशा रकमेबद्दल त्याच्या हक्कसंबंधावर ट्रस्टीचा बोजा राहील. विश्वासघातानें फायदा करून घेणाऱ्या मनुष्याकडून नुकसानाची भरपाई होण्याचा हक्क.

जो ट्रस्टी, असा विश्वासघात करण्यामध्यें, कपट केल्याबद्दल अपराधी असेल, त्याला या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून नुकसान भरून मिळण्याचा हक्क प्राप्त होतो असें समजूं नये.

३४. कोणत्याही ट्रस्टीला, दावा न मांडतां, अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाला अर्ज करून, अशा कोर्टाच्या मतें संक्षिप्त रीतीनें निकाल करण्यालायक नसतील असे तपशिलाच्या, कठीण, अगर महत्वाचे प्रश्न खेरीज करून इतर, ट्रस्टच्या मिळकतीच्या व्यवस्थेसंबंधी अगर वहिवाटीसंबंधी कोणत्याहि तूर्त विचाराच्या प्रश्नांसंबंधीं त्या कोर्टाचा अभिप्राय, सल्ला अगर हुकूम मागतां येईल. ट्रस्टच्या मिळकतीच्या व्यवस्थेच्या संबंधानें अभिप्रायाकरितां कोर्टाला अर्ज करण्याचा हक्क.

अशा अर्जाशीं संबंध असणाऱ्या मनुष्यांपैकीं जे कोर्टास योग्य वाटतील त्यांवर त्या अर्जाची एक नकल बजाविली पाहिजे, व त्यांस त्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळीं हजर राहतां येईल.

ट्रस्टीनें अशा अर्जांतील हकीकत खऱ्या भावानें सांगितली असली, व त्या कोर्टानें दिलेल्या अभिप्रायाप्रमाणें, सल्ल्याप्रमाणें अगर हुकुमाप्रमाणें तो वागला असला तर, त्यानें, खुद्द आपल्या जबाबदारीच्या संबंधानें, त्या अर्जाच्या विषयाच्या प्रकरणीं अशा ट्रस्टीच्या नात्यानें आपलें काम बजावलें असें समजलें पाहिजे.

या कलमाअन्वयें केलेल्या प्रत्येक अर्जाच्या खर्चाची बाबत, ज्या कोर्टाकडे तो अर्ज केला असेल त्याच्या नजरेवर सोंपली आहे.

**हिशोब नक्की करण्याबाबद हक्क.**

३५. ट्रस्टीच्या नात्याचीं आपलीं कामें आटपलीं ह्मणजे ट्रस्टीला, ट्रस्टच्या मिळकतीची त्यानें वहिवाट केली तिचा हिशोब तपासवून नक्की करविण्याचा, व ट्रस्टअन्वयें हिताधिकाऱ्याला कांहीं देणें राहिलें नसेल तेव्हां, तशा मजकुराचा लेख लिहून घेण्याचा हक्क आहे.

**ट्रस्टीचा साधारण अधिकार.**

३६. या ॲक्टामध्यें व ट्रस्टच्या लेखामध्यें स्पष्टपणें दिलेल्या अधिकाराशिवाय आणखी, अशा लेखांत कांहीं इयत्ता सांगितल्या असल्यास त्यांस, व १७ व्या कलमांतील ठरावांस पात्र राहून, ट्रस्टीला ट्रस्टच्या मिळकतीच्या वसुलातीसाठीं, संरक्षणासाठीं अगर हितासाठीं, व करार करण्याविषयीं लायक नसणाऱ्या हिताधिकाऱ्याच्या संरक्षणासाठीं अगर पोषणासाठीं वाजवी व योग्य असतील अशीं सर्व कृत्यें करतां येतील.

ट्रस्टची मिळकत पट्ट्यानें देणें असल्यास ती, कोणत्याहि ट्रस्टीनें, अवल अधिकाऱ्याच्या मुख्य दिवाणी कोर्टाच्या परवानगीशिवाय, पट्टा करून देण्याचे तारखेपासून एकवीस वर्षांहून जास्त मुदतीपर्यंत देवूं नये, तसेंच ती वाजवी रीतीनें जेवढें ह्मणून वार्षिक भाडें मिळूं शकेल तेवढ्याबद्दल शर्त घातल्यावांचून देऊं नये.

**लाट करून जाहिर लिलावानें अगर खासगी करारानें विकण्याचा अधिकार.**

३७. ट्रस्टीला कोणतीही ट्रस्टची मिळकत विकण्याचा अधिकार दिलेला असेल तेव्हां, ट्रस्टच्या लेखांत इतर रीतीनें सांगितलेलें नसल्यास, त्याला ती, पूर्वीच्या बोज्यांस पात्र ठेवून अगर न ठेवतां, सगळी एकदम अगर लाट करून, जाहीर लिलावानें अगर खासगी करारानें, आणि एकाच वेळीं अथवा निरनिराळ्या वेळीं विकतां येईल.

**विशेष शर्तींअन्वयें विकण्याचा अधिकार.**

३८. अशी कोणतीही विक्री करणाऱ्या ट्रस्टीला विक्रीच्या कोणत्याहि शर्तींमध्यें अगर विक्रीच्या कोणत्याहि करारामध्यें, सत्ताधिकाराच्या संबंधानें अगर सत्ताधिकाराच्या पुराव्याच्या संबंधानें, किंवा इतर रीतीनें, आपणास योग्य वाटतील तसे वाजवी ठराव दाखल करतां येतील; तसेंच त्याला, लिलावानें होणाऱ्या कोणत्याही विक्रीमध्यें ती मिळकत अगर तिचा कोणताहि भाग विकत घेतां, आणि विक्रीचा कोणताही करार रद्द करतां अगर त्यांत फेरफार करतां येईल, आणि याप्रमाणें विकत घेतली असेल अगर जिच्या संबंधानें याप्रमाणें करार रद्द केलेला असेल ती मिळकत पुनः विकतां येईल, आणि त्यामुळें कोणतेंही नुकसान झाल्यास त्याबद्दल तो हिताधिकाऱ्याला जबाबदार होत नाहीं.

**विकत घेण्याचा व पुनः विकण्याचा अधिकार.**

**ट्रस्टची मिळकत विकण्याला वेळाची मोकळीक.**

ट्रस्टीला ट्रस्टची मिळकत विकण्यास अथवा ट्रस्टचा पैसा मिळकत खरीद करण्यामध्यें लावण्यास सांगितलेलें असेल, तेव्हां त्याला, ती विक्री अगर खरेदी वाजवी रीतीनें त्याच्या नजरेस येईल त्यावेळीं करण्याची मोकळीक आहे.

**उदाहरणें.**

(अ) य हा बला आपल्या मृत्युलेखांत मिळकत देऊन ठेवून त्यास असें सांगतो कीं, ती मिळकत होईल तितक्या सोईवार त्वरेनें विकून, जें उत्पन्न होईल तें कला द्यावें. यावरून विक्री लागलीच केली पाहिजे असें होत नाहीं.

(ब) अ हा बला आपल्या मृत्युलेखांत मिळकत देऊन ठेवून त्यास असें सांगतो कीं, त्याला योग्य वाटेल त्या वेळीं व त्या रीतीनें ती विकून, जें उत्पन्न होईल तें कच्या हिताकरितां लावावें. यावरून ब व क यांच्या परस्परसंबंधानें ह्मटलें असतां, ती विक्री पाहिजे तितक्या मुदतीपर्यंत तहकूब ठेवण्याचा बला अख्त्यार मिळतो असें नाहीं.

दुसऱ्याच्या नांवीं करून देण्याचा अधिकार.

३९. या प्रकारची कोणतीहि विक्री पुरी करण्याच्या कारणाकरितां ट्रस्टीला, विकलेली मिळकत, जरूर असेल त्या रीतीप्रमाणें दुसऱ्याच्या नांवीं करून देण्याचा अगर तिची इतर रीतीनें व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

मिळकत लावण्याच्या संबंधानें फेरफार करण्याचा अधिकार.

४०. ट्रस्टीच्या नजरेस येईल तर त्याला, कोणत्याहि सिक्युरिटींमध्यें लावलेली कोणतीहि ट्रस्टची मिळकत मागें घेऊन ती २० व्या कलमांत सांगितलेल्या किंवा उल्लेख केलेल्या सिक्युरिटींपैकीं कोणत्याहि सिक्युरिटींवर लावतां, व याप्रमाणें कोणत्याहि सिक्युरिटींवर लावलेली मिळकत काढून ती वेळोवेळीं त्याच प्रकारच्या दुसऱ्या सिक्युरिटींवर लावतां येईल:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कोणी मनुष्य करार करण्याविषयीं लायक असून, त्याला त्या वेळीं त्याच्या हयातीपर्यंत, अथवा त्याहून कोणत्याहि जास्त हक्कसंबंधापर्यंत ट्रस्टच्या मिळकतीचें उत्पन्न घेण्याचा हक्क असेल, तेव्हां त्याच्या लेखी संमतीवांचून सदहूप्रमाणें मिळकत लावण्याच्या संबंधानें अदलाबदल करतां कामा नये.

अल्पवयी मनुष्यांची मिळकत त्यांच्या पालनाकडे वगैरे लावण्याचा अधिकार.

४१. जेव्हां ट्रस्टी, अल्पवयी मनुष्याकरितां ट्रस्टनें कोणतीही मिळकत धारण करीत असेल तेव्हां, अशा ट्रस्टीला त्याच्या नजरेस येईल त्याप्रमाणें, अशा मिळकतीच्या संबंधानें त्या मनुष्यास जें उत्पन्न येण्याचा हक्क असेल तें सगळें अथवा त्याचा कोणताही भाग, त्याचे कोणी पालनकरणारे असल्यास त्यांच्याजवळ देतां येईल, किंवा त्याचें पालन किंवा विद्याभ्यास किंवा चढती यांकरितां अगर यांकडे, अथवा त्याचे धर्मभक्तीचा, लग्नाचा किंवा उत्तरकार्याचा वाजवी खर्च करण्याकरितां अगर करण्याकडे लावतां येईल; आणि अशा ट्रस्टीनें अशा उत्पन्नाचा सर्व अवशेष, तो व त्यापासून निपजणारें उत्पन्न २० व्या कलमांत सांगितलेल्या किंवा उल्लेख केलेल्या सिक्युरिटींपैकीं कोणत्याहि सिक्युरिटींमध्यें वेळोवेळीं लावून चक्रवाढ व्याजानें वाढविला पाहिजे व तो अशी रकम ज्या मिळकतींतून वाढली असेल ती मिळकत अखेर ज्या मनुष्यास मिळण्याचा हक्क असेल त्याच्या हिताकरितां वाढविला पाहिजे: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा ट्रस्टीला, त्यास योग्य वाटेल तर, अशी वाढलेली सगळी रकम अगर तिचा कोणताहि भाग त्या वेळीं चालू असणाऱ्या वर्षामध्यें निपजणाऱ्या उत्पन्नाचा भाग असल्याप्रमाणें कामीं लावतां येईल.

ट्रस्टच्या मिळकतीचें उत्पन्न, अल्पवयी मनुष्याचें पालन किंवा विद्याभ्यास किंवा चढती यांकरितां, अथवा त्याच्या धर्मभक्तीच्या, लग्नाच्या अगर उत्तरकार्याच्या वाजवी खर्चाकरितां पुरण्याजोगें नसेल तेव्हां, ट्रस्टीला, अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाची परवानगी घेऊन, असें पालन, विद्याभ्यास, चढती अथवा खर्च यांकरितां किंवा यांकडे अशी सगळी मिळकत अगर तिचा कोणताहि भाग लावतां येईल, परंतु अशा परवानगीवांचून लावतां येणार नाहीं.

अल्पवयी मनुष्यांच्या जाती निसबत व मिळकतीसंबंधीं त्या त्या वेळीं चालू असलेल्या कोणत्याहि स्थानिक कायद्याच्या ठरावांस या कलमांतील कोणत्याहि मजकुरावरून बाध येतो असें समजूं नये.

पावत्या देण्याचा अधिकार.

४२. कोणत्याही ट्रस्टींला किंवा ट्रस्टीला, कोणत्याही ट्रस्टच्या अगर अधिकाराच्या कारणानें अथवा तो चालविण्याच्या संबंधानें त्यांच्या किंवा त्याच्या जवळ द्यावयाच्या किंवा तवदील करावयाच्या किंवा त्यांच्या किंवा त्याच्या स्वाधीन करावयाच्या कोणत्याही पैशाबद्दल, सिक्युरिटींबद्दल किंवा इतर जंगम मिळकतीबद्दल पावती लिहून देतां येईल; आणि तो ऐवज देणारा, तवदील करणारा अगर स्वाधीन करणारा मनुष्य, कपट केलेलें नसल्यास, त्या पावतीवरून, त्या ऐवजाच्या, त्याच्या विनियोग करण्या संबंधानें

पाहण्याच्या, अथवा त्याचा कोणत्याहि प्रकारें नाश किंवा दुर्विनियोग झाल्याबद्दलच्या जबाबदारींतून सुटेल.

तोडजोड वगैरे करण्याचा अधिकार.

४३. एकत्र मिळून काम करणाऱ्या दोन किंवा अधिक ट्रस्टींला, त्यांस योग्य वाटेल तर व योग्य वाटेल तसें,—

(अ) मागणी केलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल किंवा कोणत्याही मिळकतीबद्दल कोणतीही तोडजोड किंवा कोणतेंही तारण कबूल करितां येईल;

(ब) कोणत्याही कर्जाच्या फेडीबद्दल कोणतीही मुदत देतां येईल;

(क) ट्रस्टशीं संबंध असणारें हरप्रकारचें कर्ज, हिशोब, दावा किंवा वस्तु यांची तोडजोड करतां येईल, तीं सोडून देतां येतील, पंचांकडे सोंपतां येतील किंवा त्यांचा इतर रीतीनें निकाल करतां येईल; आणि,

(ड) सदरीलपैकीं कोणत्याही कारणाकरितां, त्यांस इष्ट दिसतील तशा कोणत्याही कबुलायती, तोडजोडीचे किंवा व्यवस्थेचे लेख, फारिखती व इतर वस्तु करतां, देतां व करून देतां येतील, व त्यांनीं खऱ्या भावानें याप्रमाणें केलेल्या कोणत्याही कृत्यामुळें किंवा वस्तूमुळें झालेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल ते जबाबदार होणार नाहींत.

एकत्र मिळून काम करणाऱ्या दोन किंवा अधिक ट्रस्टींला या कलमांत दिलेले अधिकार, ट्रस्टचा लेख असल्यास, त्यांत ट्रस्ट व त्याचा अधिकार बजावण्याचा अखत्यार एकाच ट्रस्टीस दिलेला असेल तेव्हां एकाच काम करणाऱ्या ट्रस्टींला चालवितां येतील.

हें कलम, ट्रस्टचा लेख असल्यास, त्यांत जर व जेथवर उलट इरादा सांगितलेला नसेल तर व तेथवर मात्र लागू आहे, आणि त्याचा अमल, त्या लेखाच्या अटींस व त्यांतील ठरावांस पात्र राहून, चालेल.

हें कलम, हा आक्ट अमलांत आल्यानंतर उत्पन्न केलेल्या ट्रस्टांस मात्र लागू आहे.

अनेक ट्रस्टींतून एकजण हक्कत्याग करील किंवा मरण पावेल तर बाकीच्यांना अधिकार.

४४. ट्रस्टच्या मिळकतीची व्यवस्था ठेवण्याचा अखत्यार अनेक ट्रस्टींना दिलेला असून त्यांपैकीं एकजण हक्कत्याग करील अगर मरण पावेल तर, उरलेल्या ट्रस्टींहून जास्त मनुष्यांनीं तो अखत्यार चालवला पाहिजे असें ट्रस्टच्या लेखाच्या अटींवरून दिसून येत नसेल तर, बाकी उरलेल्या ट्रस्टींना तो अखत्यार चालवितां येईल.

हुकूमनाम्यावरून ट्रस्टीचे अधिकार तहकूब.

४५. ट्रस्टच्या बजावणीबद्दलच्या दाव्यामध्यें हुकूमनामा झालेला असेल तेव्हां, ट्रस्टीनें आपले कोणतेहि अधिकार अशा हुकूमनाम्याबाहेर, अथवा तो हुकूमनामा करणाऱ्या कोर्टाच्या, अथवा त्या हुकूमनाम्यावर अपील चालू असेल तेव्हां, अपील कोर्टाच्या मंजुरीवांचून चालवतां कामा नयेत.

---

## बाब ९.

### ट्रस्टींच्या नालायकीविषयीं.

पतकरानंतर ट्रस्टीला त्याग करतां येत नाहीं.

४६. ज्या ट्रस्टीनें ट्रस्ट पतकरिला असेल त्याला त्याचा त्याग नंतर (अ) अव्वल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाच्या परवानगीवांचून, अथवा (ब) हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असल्यास, त्याच्या संमतीवांचून, अथवा (क) ट्रस्टच्या लेखांत विशेष अधिकार दिलेला असल्यावांचून, करतां येणार नाहीं.

ट्रस्टीला आपलें काम वगैरे सोंपून देतां येणार नाहीं.

४७. ट्रस्टीला आपला हुद्दा अथवा आपलें कोणतेंहि काम, एकाद्या सहट्रस्टीला अथवा परकी मनुष्याला पुढील प्रकार असल्यावांचून सोंपून देतां येणार नाहीं, म्हणजे—

अ) ट्रस्टच्या लेखामध्यें त्याप्रमाणें ठराव असल्यावांचून, अथवा (ब) याप्रमाणें सोंपून देणें हें कामाच्या नेहमीच्या सरणींतलें असल्यावांचून, अथवा (क) असें सोंपून देणें जरूर असल्यावांचून, अथवा (ड) हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असून त्यानें याप्रमाणें सोंपून देण्याविषयीं संमति दिल्यावांचून, तसें करतां येणार नाहीं.

खुलासा.—जें कृत्य केवळ कामगिरीसंबंधीं असून ज्यांत स्वतंत्रपणें नजर चालविण्याचा संबंध नाहीं असें एकादें कृत्य करण्याकरितां एकादा अटर्नी अथवा प्रतिनिधि नेमणें हें या कलमाच्या अर्थाप्रमाणें सोंपून देणें होत नाहीं.

उदाहरणें.

(अ) ब आणि क यांनीं अथवा या दोघांतून मागें उरेल त्यानें अथवा अशा मागें उरलेल्या असामीच्या असैनांनीं वजवावयाच्या कांहीं ट्रस्टांवर अ हा ब व क यांना अमुक एक मिळकत आपल्या मृत्युलेखांत देवून ठेवतो. ब मरतो. कला, कच्या मृत्युलेखांतील ट्रस्टांवर ड व ई यांना ती ट्रस्टची मिळकत मृत्युलेखाच्या द्वारें देतां येईल.

(ब) अ हा अमुक एका मिळकतीचा ट्रस्टी असून ती विकण्याचा त्याला अधिकार आहे. अला हें विक्रीचें काम एकाद्या लिलाववाल्याकडे देतां येईल.

(क) अ हा माही भाड्यानें दिलेलीं पन्नास घरें, त्यांचें भाडें वसूल करून कला देण्याकरितां, बला आपल्या मृत्युलेखांत ट्रस्टनें देऊन ठेवितो. बला हें भाडें वसूल करण्याकरितां कोणी योग्य मनुष्य नेमतां येईल.

४८. एकाहून जास्त ट्रस्टी असतील तेव्हां, ट्रटच्या लेखांत इतर रीतीनें ठरविलेलें नसेल तर, सर्वांनीं मिळून ट्रस्ट बजावण्याचें काम केलें पाहिजे. सहट्रस्टी एकएकटे काम चालवूं शकत नाहींत.

४९. नजरेस येईल त्याप्रमाणें करण्याचा ट्रस्टीला दिलेला अधिकार वाजवी रीतीनें व खऱ्या भावानें चालविला जात नसेल तेव्हां, अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाला अशा अधिकारावर निर्बंध ठेवतां येईल. नजरेस येईल त्याप्रमाणें करण्याच्या अधिकारावर निर्बंध.

५०. ट्रस्टच्या लेखांत उलट पक्षीं उघड सांगितलेलें नसेल, किंवा ट्रस्ट पतकरते वेळीं हिताधिकाऱ्याबरोबर अथवा कोर्टाबरोबर उलट करार केलेला नसेल तेव्हां, ट्रस्ट बजावण्याचे कामीं ट्रस्टीला झालेल्या मेहनतीबदल, त्यानें खर्च केलेल्या कौशल्याबदल अगर त्याचा वेळ गेल्याबदल त्याला मुशारा मिळण्याचा हक्क नाहीं. ट्रस्टीला कामाबदल बोजा घालतां येणार नाहीं.

या कलमांतील कोणताहि मजकूर कोणत्याही आफिशियल ट्रस्टीला, ॲडमिनिस्ट्रेटर जनरल याला, पब्लिक क्युरेटरला अथवा वहिवाटीचें सर्टिफिकेट धारण करणाऱ्या मनुष्याला लागू होत नाहीं.

५१. ट्रस्टीला आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं अथवा ट्रस्टशीं संबंध नसणाऱ्या इतर कोणत्याहि कारणासाठीं ट्रस्टच्या मिळकतीचा उपयोग करतां येणार नाहीं किंवा तिच्या संबंधानें व्यवस्था करतां येणार नाहीं. ट्रस्टीला ट्रस्टच्या मिळकतीचा आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं उपयोग करतां येणार नाहीं.

५२. ट्रस्टची मिळकत विकण्याचें ज्याचें काम असेल अशा ट्रस्टीला, व अशा विक्रीच्या कामासाठीं अशा ट्रस्टीनें लावलेल्या मुखत्याराला, आपल्या स्वतःकरितां अथवा तिसऱ्या मनुष्याचा मुखत्यार या नात्यानें, सदहू मिळकत अगर त्यांतील कोणताही हक्कसंबंध, साक्षात् अगर पर्यायानें विकत घेतां येणार नाहीं. विक्रीबदलचा ट्रस्टी अगर त्याचा मुखत्यार यास विकत घेतां येणार नाहीं.

ट्रस्टीला परवानगीशिवाय हितांधिकाऱ्याचा हक्कसंबंध विकत घेतां येणार नाहीं.

९३. कोणत्याहि ट्रस्टीला, व जो मनुष्य ट्रस्टी असण्याचा नुकताच बंद झालेला असेल त्याला, अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाच्या परवानगीवांचून, ट्रस्टची मिळकत अगर तिचा कोणताहि भाग विकत घेतां, गहाण घेतां अथवा पट्यानें घेतां येणार नाहीं; आणि योजिलेली खरेदी, गहाण अथवा पट्टा निखालस हिताधिकाऱ्याला फायदेशीर असल्याखेरीज अशी परवानगी देतां कामा नये.

खरेदीबदलचा ट्रस्टी.

आणि हिताधिकाऱ्यासाठीं अमुक एक मिळकत विकत घेण्याचें अथवा गहाण घेण्याचें अथवा पट्टयानें घेण्याचें ज्याचें काम असेल अशा ट्रस्टीला स्वतःकरितां ती मिळकत किंवा तिचा कोणताही भाग विकत घेतां अथवा गहाण घेतां अथवा पट्टयानें घेतां येणार नाहीं.

सह-ट्रस्टींला आपल्यापैकीं एकाला कर्ज देतां येणार नाहीं.

९४. गहाणावर अथवा आंगउधार ट्रस्टचा पैसा लावण्याचें ज्या ट्रस्टीचें अगर सहट्रस्टीचें काम असेल त्यानें तो स्वतःला गहाणावर अगर आंगउधार घेतां कामा नये अगर आपल्या सहट्रस्टींपैकीं एकाचाला त्याप्रमाणें देतां कामा नये.

---

## बाब ६.

### हिताधिकाऱ्याचे हक्क व जबाबदाऱ्या यांविषयीं.

भाडें व उत्पन्न यांवर हक्क.

९५. ट्रस्टच्या लेखांतील ठरावांस पात्र राहून, हिताधिकाऱ्याला ट्रस्टच्या मिळकतीचें भाडें व उत्पन्न मिळण्याचा हक्क आहे.

विशेष बजावणीबदल हक्क.

९६. हिताधिकाऱ्याला, ट्रस्टच्या कर्त्याचा इरादा, आपल्या हक्कसंबंधापुरता, विशेष रीतीनें वजावून मिळण्याचा हक्क आहे;

कबजा तबदील करून मिळण्याचा हक्क.

आणि एकच हिताधिकारी असून तो करार करण्याविषयीं लायक असेल तेव्हां, अथवा अनेक हिताधिकारी असून ते करार करण्याविषयीं लायक असतील व त्या सर्वांचें एक मत असेल तेव्हां, त्याला किंवा त्यांला, ट्रस्टची मिळकत आपणाला अगर आपणांला, अगर तो किंवा ते सांगतील त्या मनुष्याला तबदील करून देण्याविषयीं ट्रस्टीस फर्मावितां येईल.

विवाहित स्त्रीला आपला हितसंबंध आपणाला नाहींसा करण्याचा अधिकार नसावा अशा प्रकारें तिच्या हितासाठीं मिळकत तबदील करून दिली असेल अथवा मृत्युलेखांत देऊन ठेविली असेल, तेव्हां ती विवाहित स्थितींत असे तोंपर्यंत अशा मिळकतीला या कलमाच्या दुसऱ्या रकमेंतील कोणताही मजकूर लागू नाहीं.

उदाहरणें.

(अ) अ हा २४ वर्षांच्या वयाचा होई तोंपर्यंत व्याज जमू देऊन नंतर एकंदर रकम त्याला तबदील करून देण्याकरितां ट्रस्टनें ट्रस्टींला कांहीं सरकारी सिक्युरिटी दिलेल्या आहेत. अला, व्यवहार्य वयांत आल्यावर, ट्रस्टच्या मिळकतींत हक्कसंबंध असणारा आपण एकटाच मनुष्य असल्याकारणानें ती लागलीच आपणास तबदील करून द्यावी ह्मणून सदर्हू ट्रस्टींला सांगतां येईल.

(ब) अ हा बकरितां कांहीं आन्यूइटी खरीद करण्याकरितां १०,००० रुपये ट्रस्टनें ट्रस्टींला मृत्युलेखांत देऊन ठेवतो. ब व्यवहार्य वयांत आलेला असून इतर रीतींनीहि करार करण्याविषयीं लायक आहे. बला सदर्हू १०,००० रुपये मागतां येतील.

(क) अहा बला कांहीं मिळकत तबदील करून देऊन, ती कच्या हितासाठीं विकावी अथवा व्याजीं वगैरे लावावी ह्मणून त्यास सांगतो. क करार करण्याविषयीं लायक आहे. कची खुशी असल्यास त्याला सदहू मिळकत मूळची जशी असेल तशीच घेतां येईल.

९७. ट्रस्टीविरुद्ध, व ट्रस्टची खबर असून त्याच्या पोटीं दावा सांगणाऱ्या सर्व मनुष्यांविरुद्ध हिताधिकाऱ्याला, ट्रस्टचा लेख, केवळ ट्रस्टच्या मिळकतीच्याच संबंधाचे सत्ताधिकाराचे दस्तऐवज, ट्रस्टच्या मिळकतीचे हिशोब व त्यांच्या पुष्टीचे कांहीं दाखल्याचे कागद [व्हौचर] असल्यास ते, व ट्रस्टीनें आपलें काम बजावण्यामध्यें आपल्या समजुतीसाठीं सादर केलेलीं प्रकरणें व घेतलेले अभिप्राय, हीं पाहण्याचा व त्यांच्या नकला घेण्याचा हक्क आहे. ट्रस्टचा लेख, हिशोब वगैरे पाहण्याचा व त्यांच्या नकला घेण्याचा हक्क.

९८. हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असल्यास; त्याला आपला हक्कसंबंध तबदील करून देतां येईल, परंतु तो, कोणत्या प्रसंगीं व कितपत अशा हक्कसंबंधाची त्याला व्यवस्था करतां येईल या विषयींच्या त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्यास पात्र राहून, तबदील केला पाहिजे: हितसंबंध तबदील करून देण्याचा हक्क.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, विवाहित स्त्रीला आपला हितसंबंध आपणाला नाहींसा करण्याचा अधिकार नसावा अशा प्रकारें तिच्या हितासाठीं मिळकत तबदील करून दिली असेल अथवा मृत्युलेखांत देऊन ठेविली असेल तेव्हां, या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून तिला, ती विवाहित स्थितींत असे तोंपर्यंत, असा हितसंबंध तबदील करून देण्याचा अखत्यार प्राप्त होणार नाहीं.

९९. जेव्हां मुळींच ट्रस्टी नेमलेले नसतील अथवा सर्व ट्रस्टी मरण पावतील, हक्कत्याग करतील अथवा हुद्यावरून दूर झालेले असतील तेव्हां, किंवा इतर कोणत्याहि कारणावरून ट्रस्टीकडून ट्रस्ट बजावणें अशक्य असेल अगर अशक्य होईल तेव्हां, हिताधिकाऱ्याला ट्रस्टच्या बजावणीबद्दल दावा मांडतां येईल, आणि मग तो ट्रस्ट, ट्रस्टी अथवा नवा ट्रस्टी नेमला जाई तोंपर्यंत, शक्य असेल तेथवर, कोर्टानें बजावला पाहिजे. ट्रस्टच्या बजावणीकरितां दावा करण्याचा हक्क.

६०. हिताधिकाऱ्याला, ट्रस्टच्या मिळकतीचें संरक्षण, धारण व वहिवाट योग्य मनुष्यांकडून व अशा मनुष्यांच्या योग्य संख्येकडून योग्य रीतीनें होण्याबद्दल ( ट्रस्टच्या लेखांतील ठरावांस पात्र राहून ) हक्क आहे. योग्य ट्रस्टी मिळण्याचा हक्क.

खुलासा १.—खालीं लिहिलेले असामी या कलमाच्या अर्थाप्रमाणें योग्य मनुष्य नव्हत :—

परदेशीं स्थायिक वस्ती करून राहिलेला मनुष्य : शत्रुभावानें वागणारा परराज्यांतील मनुष्य : ज्याचा हक्कसंबंध हिताधिकाऱ्याच्या हक्कसंबंधाशीं प्रतिकूल असेल असा मनुष्य : नादार स्थितीमध्यें असणारा मनुष्य; व हिताधिकाऱ्याच्या व्यक्तिक कायद्यांत इतर रीतीनें सांगितलेलें नसेल तर, विवाहित स्त्री आणि अल्पवयी मनुष्य.

खुलासा २.—ट्रस्टच्या वहिवाटीमध्यें, पैसा घेणें व तो सांभाळणें हें येत असेल तेव्हां, ट्रस्टींची संख्या निदान दोन तरी असावी.

## उदाहरणें.

(अ) अ हा अनेक हिताधिकाऱ्यांपैकीं एक असून तो, ट्रस्टी ब यानें ट्रस्टच्या मिळकतीपैकीं कांहीं भागाची अयोग्य रीतीनें व्यवस्था केली आहे, अथवा ब नादार स्थितीमध्यें असल्याकारणानें त्या मिळकतीला धोका आहे, अथवा तो ट्रस्टीचें काम करण्याला निरूप-

योगी झालेला आहे, असें शाबीत करतो. अला ट्रस्टच्या मिळकतीसाठीं रिसीव्हर मिळूं शकेल.

(ब) अ हा कसाठीं ट्रस्टनें कांहीं जवाहीर बला आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवितो. व अच्या हयातींत मरतो; नंतर अ मरतो. सदर्हू मिळकत आपल्यासाठीं एकाद्या ट्रस्टीच्या नावें करून मागण्याचा कला हक्क आहे.

(क) अ हा बसाठीं ट्रस्टनें कांहीं मिळकत चार ट्रस्टींच्या नावें करून देतो. त्या ट्रस्टींपैकीं तिघे मरतात. मयत ट्रस्टींच्या जागीं नवे तीन ट्रस्टी नेमले जावे म्हणून बला दावा मांडतां येईल.

(ड) अ हा बसाठीं ट्रस्टनें कांहीं मिळकत तीन ट्रस्टींच्या नावें करून देतो. हे सर्व ट्रस्टी हक्कत्याग करतात. याप्रमाणें हक्कत्याग करणाऱ्या ट्रस्टींच्या जागीं तीन ट्रस्टी नेमले जावे म्हणून बला दावा मांडतां येईल.

(इ) अ हा बकरितां ट्रस्टी असून काम चालविण्याचें नाकारितो, अथवा ब्रिटिश हिंदुस्थानच्या बाहेर कायम राहण्याला जातो, किंवा नादार ठरला जातो, अथवा आपल्या धनकोंबरोबर तोडजोड करतो, किंवा आपल्या सहट्रस्टीस विश्वासघात करूं देतो. अला काढून टाकून त्याचे जागीं नवा ट्रस्टी नेमला जावा म्हणून बला दावा मांडतां येईल.

कोणतेंहि कर्तव्य करण्याचें भाग पाडण्याचा हक्क.

६१. हिताधिकाऱ्याला, आपल्या ट्रस्टीस ट्रस्टी या नात्याचें त्याचें कोणतेंहि कर्तव्य करण्याला भाग पाडण्याचा व मनांत आणलेला अगर घडण्याचा संभव असलेला कोणताही विश्वासघात करण्याची मनाई करण्याचा हक्क आहे.

उदाहरणें.

(अ) अ हा कच्या हितासाठीं दरमहा १०० रुपये बजवळ देण्याचा बशीं करार करतो. याप्रमाणें द्यावयाचा पैसा आपण ककरितां ट्रस्टनें धारण करीन असें व आपल्या सहीचें एक पत्र लिहून कळवितो. अ हा आपल्या कराराप्रमाणें पैसा द्यावयास चुकतो. कला, त्या करारावरून बच्या नांवें आपणास दावा करूं देण्याविषयीं बस, योग्य हामी देऊन, भाग पाडतां येईल.

(ब) अ हा कांहीं जमिनीबदल ट्रस्टी असून, ती विकून उत्पन्न होणारा पैसा ब आणि क यांना समसमान वांटून देण्याचा त्याला अधिकार आहे. अ सदर्हू जमीन अविचारीपणानें विकण्याच्या बेतांत आहे. अला ही विक्री करण्याची मनाई करण्याबदल हुकूम मिळण्याकरितां बला आपल्या तर्फे व कच्या तर्फे दावा करतां येईल.

ट्रस्टीकडून अन्यायाची खरेदी.

६२. ट्रस्टीनें अन्यायानें ट्रस्टची मिळकत विकत घेतलेली असेल तेव्हां, हिताधिकाऱ्याला, सदर्हू मिळकत ट्रस्टीच्या हातांत विकल्यावांचून राहिलेली असल्यास ट्रस्टीला, अथवा कोणी मनुष्यानें त्या ट्रस्टची खबर असून त्याकडून ती विकत घेतलेली असल्यास अशा मनुष्याला, ती ट्रस्टला पात्र आहे असें कळविण्याला अगर ती परत तबदील करून देण्याला लावण्याचा हक्क आहे. परंतु अशा बाबतींत हिताधिकाऱ्यानें, ट्रस्टीनें दिलेला खरेदीचा पैसा सव्याज परत दिला पाहिजे, व ती मिळकत संभाळण्यामध्यें त्यानें योग्य रीतीनें इतर कांहीं खर्च केलेला असल्यास तोहि दिला पाहिजे; आणि ट्रस्टी अगर खरीददार यानें (अ) त्या मिळकतीच्या निवळ उत्पन्नाचा हिशेब दिला पाहिजे, (ब) ती मिळकत प्रत्यक्ष त्याच्या कबज्यांत गेलेली असल्यास भोगवट्याबदल भाडें दिलें पाहिजे, व (क)

ती मिळकत ट्रस्टीच्या अगर खरीददाराच्या कृत्यांमुळें अथवा वर्जनांमुळें बिघडली असल्यास बिघाड्याच्या मानानें हिताधिकाऱ्याला सदरहू खरेदीच्या पैशांतून रकम वजा करूं दिली पाहिजे.

या कलमांतील कोणताही मजकुरावरून—

(अ) सदहूं मिळकत ट्रस्टला पात्र आहे असें कळविण्याबदल अगर ती परत तबदील करून मिळण्याबदल दावा मांडण्यापूर्वी, ज्या पट्टयानेंघेणारांनीं व इतरांनीं ट्रस्टीबरोबर अगर खरीददाराबरोबर खऱ्या भावानें करार केलेला असेल त्यांच्या हक्कांची नुकसानी होणार नाहीं; किंवा

(ब) हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असून, त्यावर सक्ती अगर गैरवाजवी दाब चालविण्यांत न येतां, त्यानें स्वतःच, प्रकरणाची हकीकत व ट्रस्टीविरुद्ध असलेले आपले हक्क यांची पूर्ण माहिती असून ट्रस्टीला विक्री कायम करून दिली असेल तेव्हां, सदहूं मिळकत ट्रस्टला पात्र आहे असें कळविण्याला अगर ती परत तबदील करून देण्याला लावण्याचा त्याला हक्क प्राप्त होत नाहीं.

ट्रस्टच्या मिळकतीचा पाठलाग करणें— तिसऱ्या मनुष्यांच्या हातीं असतांना;

६३. ट्रस्टची मिळकत ट्रस्टला प्रतिकूल अशा प्रकारें तिसऱ्या मनुष्याच्या हातांत जाईल तेव्हां, हिताधिकाऱ्याला, ती मिळकत ट्रस्टमधली आहे असें शिस्तवार रीतीनें त्याकडून कबूल करवितां येईल, अथवा ती तशी आहे असें कळवून घेण्याबदल दावा मांडतां येईल.

ज्यांत तिचें रूपांतर झालेलें असेल त्यामध्यें.

जेव्हां ट्रस्टीनें ट्रस्टच्या मिळकतीची विल्हेवाट लाविली असून, तिच्या मोबदला त्यानें घेतलेला पैसा अगर दुसरी मिळकत त्याच्या हातीं अथवा त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या अगर मृत्युलेखदानाधिकाऱ्याच्या हातीं असल्याचा पत्ता लावतां येईल तेव्हां, हिताधिकाऱ्याला अवल ट्रस्ट-मिळकतीच्या संबंधानें जे हक्क असतील तेच हक्क, शक्य असेल तेथवर, अशा पैशाच्या किंवा दुसऱ्या मिळकतीच्या संबंधानें असतील:

## उदाहरणें.

(अ) अ हा बकरितां १०,००० रुपयांबद्दल ट्रस्टी असून तो ते १०,००० रुपये कांहीं जमीन खरीद करण्यामध्यें अन्यायानें घालतो. बला ती जमीन मिळण्याचा हक्क आहे.

(ब) अ हा ट्रस्टी असून, कांहीं अंशीं आपल्या स्वतःच्या पैशानें, व कांहीं अंशीं ब बद्दलच्या एका ट्रस्टास पात्र असलेल्या पैशानें, आपल्या स्वतःच्या नांवीं अन्यायानें जमीन खरीद करतो. याप्रमाणें गैरकामीं लावलेल्या ट्रस्टच्या पैशाचे रकमेबद्दल त्या जमिनीवर बोजा असण्याचा बला हक्क आहे.

कित्येक तबदील करून घेणाराचे हक्क कायम ठेवणें.

६४. ६३ व्या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून हिताधिकाऱ्याला—

(अ) खरेदीचा पैसा देते वेळीं, अथवा मिळकत नांवें करून घेण्याचा लेख करते वेळीं ट्रस्टची खबर नसतां मोबदला देऊन खऱ्या भावानें तबदील करून घेणारा, अथवा

(ब) याप्रमाणें तबदील करून घेणाराजवळून मोबदला देऊन तबदील करून घेणारा,

याच्या हातीं गेलेल्या मिळकतीच्या संबंधानें कोणताही हक्क प्राप्त होण्याचा अधिकार मिळणार नाहीं.

ट्रस्टची मिळकत जप्त करणारा व खरीद करणारा ट्रस्टीचा फैसल्यांतील धनको हा, या कलमाच्या अर्थाप्रमाणें, मोबदला देऊन तबदील करून घेणारा होत नाहीं.

६३ व्या कलमांतील कोणताहि मजकूर, खऱ्या भावानें धारण करणाराचे हातीं फिरत फिरत आलेल्या पैशाला, चलनी नोटींला व वेचनी दस्तऐवजांला लागू होत नाहीं, अथवा त्या मजकुरावरून, सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट, कलम १०८ यास,

अगर एकादें कर्ज अथवा बोजा ज्या मनुष्याला तबदील करून दिलेला असेल त्याच्या जबाबदारीस बाध येतो असें समजूं नये.

अन्यायानें रूपांतर केलेली ट्रस्टची मिळकत ट्रस्टीनें संपादन करणें.

६५. ट्रस्टी ट्रस्टची मिळकत अन्यायानें विकील अगर इतर रीतीनें तबदील करील, आणि नंतर स्वतः त्या मिळकतीचा मालक होईल तर, मोबदला देऊन खऱ्या भावानें तबदील करून घेणाऱ्या दर्म्यानच्या मनुष्यांला खबर मिळालेली नसली तथापि, ती मिळकत पुनः ट्रस्टला पात्र होते.

मिळकत मिसळल्याच्या बाबतींत हक्क.

६६. ट्रस्टी ट्रस्टची मिळकत अन्यायानें आपल्या स्वतःच्या मिळकतींत मिसळील तर, हिताधिकाऱ्याला आपणास येणें असणाऱ्या रकमेबद्दल त्या सगळ्या फंडावर बोजा असण्याचा हक्क आहे.

भागीदार-ट्रस्टीनें ट्रस्टची मिळकत अन्यायानें भागीदारीच्या कामीं लावली असतां.

६७. कोणी भागीदार मनुष्य ट्रस्टी असून, ट्रस्टची मिळकत भागीदारीच्या धंद्यांत अथवा खातीं अन्यायानें दाखल करील तर त्याबद्दल दुसरा कोणताही भागीदार, त्याला विश्वासघाताची खबर नसल्यास, आपल्या व्यक्तिक संबंधानें हिताधिकाऱ्यांला जबावदार होत नाहीं.

अशी खबर मिळालेले भागीदार सदर्हू विश्वासघाताबद्दल एकाजथीं व त्यप्रेकीं जबाबदार आहेत.

उदाहरणें.

(अ) अ व ब हे भागीदार आहेत. अ हा झ करितां ट्रस्टनें आपली सर्व मिळकत बला मृत्युलेखांत देऊन ठेवून, व बला आपला एकटाच मृत्युलेखचालविणारा नेमून, मरतो. व तें भागीदारीचें काम बंद न करितां सर्व मालमत्ता त्या धंद्यांत राहूं देतो. तर भांडवलापैकीं अच्या हिशापासून जें कांहीं उत्पन्न झालें असेल तितक्याबद्दल झला, बस, भागीदार या नात्यानें, हिशोब देण्याचें भाग पाडतां येईल. ब हा अच्या मालमत्तेच्या दुर्विनियोगाबद्दलहि झला जबाबदार आहे.

(ब) अ हा व्यापारी, ककरितां ट्रस्टनें बला आपली मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेवितो, बला आपला एकटाच मृत्युलेखचालविणारा नेमितो, व मरतो. ब हा क्ष व य यांबरोबर त्याच व्यापारांत भागीदार होतो, आणि अची मालमत्ता त्या भागीदारीच्या धंद्यांत लावतो. ब हा क्ष व य यांना कच्या हक्कांविरुद्ध हामी देतो. येथें क्ष व य हे बनें केलेल्या विश्वासघातांत जाणूनबुजून सामील झाल्याकारणानें बबरोबर कला जबाबदार आहेत.

विश्वासघातामध्यें सामील होणाऱ्या हिताधिकाऱ्याची जबाबदारी.

६८. अनेक हिताधिकाऱ्यांपैकीं जेव्हां एकजण—

(अ) विश्वासघात करण्यामध्यें सामील होईल, किंवा

(ब) इतर हिताधिकाऱ्यांच्या संमतीवांचून, अशा विश्वासघातापासून जाणूनबुजून कोणताही फायदा करून घेईल, किंवा

(क) केलेल्या अगर करण्याचा इरादा असलेल्या विश्वासघाताची माहिती असून ती गोष्ट खरोखर छपवील, अगर इतर हिताधिकाऱ्यांचे हक्कसंबंध रक्षण करण्याची योग्य तजवीज वाजवी वेळाचे आंत न करील, किंवा

(ड) ट्रस्टीला फसवून त्यायोगें विश्वासघात करण्याला त्याला प्रवृत्त करील,

तेव्हां इतर हिताधिकाऱ्यांला, त्याच्याविरुद्ध व (विश्वासघाताची खबर नसून मोबदल्यानें तबदील करून घेणारांखेरीज इतर) त्याच्या पोटीं दावा सांगणाऱ्या सर्व मनुष्यांच्या विरुद्ध विश्वासघातानें झालेल्या नुकसानाची भरपाई होई तोंपर्यंत, त्याचा सर्व हितसंबंध अटकावून ठेवविण्याचा हक्क आहे.

जेव्हां विवाहित स्त्रीला आपला हितसंबंध आपणाला नाहींसा करण्याचा अधिकार नसावा अशा प्रकारें तिच्या हितासाठीं मिळकत तबदील करून दिलेली असेल अथवा मृत्युलेखांत देऊन ठेविलेली असेल तेव्हां, ती विवाहित स्थितींत असे तोंपर्यंत, अशा मिळकतीला या कलमांतील कोणताही मजकूर लागू नाहीं.

६९. हिताधिकारी ज्या कोणाला आपला हक्कसंबंध तबदील करून देईल अशा हरएक मनुष्याला, अशा तबदिलीचे तारखेस अशा हक्कसंबंधाबाबद हिताधिकाऱ्याला जे हक्क व ज्या जबाबदाऱ्या असतील ते हक्क त्यास प्राप्त होतील व तो त्या जबाबदाऱ्यांस पात्र होईल. हिताधिकाऱ्याकडून तबदील करून घेणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

---

## बाब ७.

### ट्रस्टीचा हुद्दा रिकामा होणें याविषयीं.

७०. ट्रस्टीचा हुद्दा त्याच्या मरणानें अथवा तो त्याच्या हुद्द्यावरून दूर झाल्यानें रिकामा होतो. हुद्दा कशानें रिकामा होतो.

७१. खालील प्रकार असेल तेव्हांच मात्र ट्रस्टी आपल्या हुद्द्यावरून दूर होऊं सकतो, ह्मणजे :— ट्रस्टी हुद्द्यावरुन दूर होणें.

(अ) ट्रस्ट नष्ट झाल्यानें;

(ब) ट्रस्टअन्वयेंचीं त्याचीं कामें पुरीं झाल्यानें;

(क) ट्रस्टच्या लेखांत सांगितलेल्या साधनांच्या योगें;

(ड) त्याच्या जागीं या आक्टाअन्वयें नवा ट्रस्टी नेमल्यानें;

(इ) त्याच्या स्वतःच्या व, करार करण्याविषयीं लायक असल्यास हिताधिकाऱ्याच्या, अथवा एकापेक्षां अधिक हिताधिकारी असतील तेथें, सर्व हिताधिकाऱ्यांच्या संमतीनें; किंवा

(फ) त्याला दूर करण्याबद्दल या आक्टाअन्वयें ज्या कोर्टास अर्ज केला असेल त्या कोर्टाकडून.

७२. ११ व्या कलमांत कोणतेही ठराव असले तथापि, प्रत्येक ट्रस्टीला आपणास आपल्या हुद्द्यावरून दूर करण्याबद्दल अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाला अर्जाच्या द्वारें विनंति करतां येईल, व याप्रमाणें दूर करण्याला पुरतें कारण आहे असें कोर्टास आढळल्यास, तें त्याला त्याप्रमाणें दूर करूं शकेल, आणि त्याचा खर्च ट्रस्टच्या मिळकतींतून देण्याबद्दल फर्मावूं शकेल. परंतु असें कारण नसेल तेव्हां, त्याची जागा पतकरण्याला योग्य मनुष्य मिळाल्यावांचून कोर्टानें त्याला दूर करतां कामा नये. ट्रस्टांतून दूर होण्याविषयीं अर्ज.

७३. जेव्हां ट्रस्टी नेमलेला कोणी मनुष्य हक्कत्याग करील, अगर मूळचा किंवा बदली नेमलेला कोणी ट्रस्टी मरेल, अथवा एकसारखा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत ब्रिटिश हिंदुस्थानांतून गैरहजर राहील, अथवा देशान्तरीं जाऊन राहण्याकरितां ब्रिटिश हिंदुस्थान सोडून जाईल, अथवा नादार ठरला जाईल, अथवा ट्रस्टांतून दूर होण्याची इच्छा दर्शवील, अथवा ट्रस्टमध्यें काम करण्याचें नाकारील, अगर अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टाच्या मतें असें काम करण्याला अयोग्य अगर शरीरानें नालायक होईल, अथवा एकादा प्रतिकूळ ट्रस्ट पतकरील, तेव्हां त्याच्या जागीं नवा ट्रस्टी नेमण्याचा खालील मनुष्याला अधिकार आहे, ह्मणजे— मरणाच्या वगैरे कारणानें नव्या ट्रस्टींची नेमणूक.

(अ) ट्रस्टचा लेख असल्यास, त्यांत त्या कारणाकरितां ज्याचें नांव लिहिलेलें असेल त्या मनुष्याला, अथवा

(ब) असा कोणी मनुष्य नसेल, अगर असा कोणी मनुष्य काम करण्याला समर्थ व खुषी नसेल, तर ट्रस्टचा कर्ता जीवंत असून करार करण्या-

विषयीं लायक असल्यास त्याला, किंवा त्या त्या वेळीं मागें उरलेल्या अगर चालू असलेल्या ट्रस्टींला किंवा ट्रस्टीला, अथवा मागें उरलेल्या अगर चालू असलेल्या शेवटच्या ट्रस्टीच्या कायदेशीर प्रतिनिधीला, किंवा सर्व ट्रस्टी एकाच वेळीं काम सोडून देतील तर ( कोर्टाच्या संमतीनें ) त्यांला, किंवा ( तशाच संमतीनें ), शेवटीं काम सोडून देणाऱ्या ट्रस्टीला,

अधिकार आहे.

अशी हरएक नेमणूक लिहून केली पाहिजे व ती करणाऱ्या मनुष्याची त्या लेखावर सही असली पाहिजे.

एका नव्या ट्रस्टीची नेमणूक झाल्यावर ट्रस्टींची संख्या वाढवितां येईल.

ज्या कोणत्याही प्रकरणांत एकच ट्रस्टी नेमावयाचा असून तो एकच ट्रस्टी असावयाचा असें असेल त्यांत, या कलमाअन्वयें, आफिशियल ट्रस्टीला, त्याचे संमतीनें व कोर्टाचे हुकुमानें, नेमतां येईल.

मयत झालेल्या ट्रस्टीसंबंधाच्या या कलमांतील ठरावांमध्यें, मत्युलेखांत ज्याचें नांव ट्रस्टीदाखल लिहिलेलें असेल परंतु जो मत्युलेखकर्त्यापूर्वीं मरण पावलेला असेल त्या मनुष्याचा समावेश होतो, आणि चालू असलेल्या ट्रस्टीसंबंधाच्या या कलमांतील ठरावांमध्यें, नाकारणारा अगर काम सोडून देणारा ट्रस्टी हा ट्रस्टीच्या अधिकाराच्या बजावणीमध्यें काम करण्यास खुषी असल्यास, त्याचा समावेश होतो.

कोर्टाकडून नेमणूक.

७४. जेव्हां सदरीलप्रमाणें एकादी जागा रिकामी पडेल अथवा कोणी ट्रस्टी नालायक होईल, आणि ७३ व्या कलमाअन्वयें नवा ट्रस्टी नेमणें शक्य नाहीं असें आढळून येईल तेव्हां, हिताधिकाऱ्याला, दावा न मांडतां, अवल अधिकाराच्या मुख्य दिवाणी कोर्टास, कोणी ट्रस्टी अगर नवा ट्रस्टी नेमण्याबदल अर्जाच्या द्वारें विनंति करतां येईल, व त्याप्रमाणें कोर्टाला कोणी ट्रस्टी अगर नवा ट्रस्टी नेमतां येईल.

नवे ट्रस्टी निवडण्याविषयीं नियम.

नवे ट्रस्टी नेमतांना कोर्टानें, (अ) ट्रस्टच्या लेखांत लिहिलेली अगर त्यापासून अनुमानानें निघणारी ट्रस्टच्या कर्त्याची इच्छा, (ब) नवे ट्रस्टी नेमण्याचा अखत्यार कोणा मनुष्यास दिलेला असल्यास त्याची इच्छा, (क) अशी नेमणूक केल्यानें ट्रस्टच्या बजावणीस साह्य मिळेल किंवा तिला अडथळा येईल ही गोष्ट, व (ड) एकापेक्षां अधिक हिताधिकारी असतील तेव्हां, अशा सर्व हिताधिकाऱ्यांचे हक्कसंबंध, यांकडे लक्ष दिलें पाहिजे.

नव्या ट्रस्टींमध्यें ट्रस्टची मिळकत निविष्ट होणें.

७५. जेव्हां ७३ व्या अगर ७४ व्या कलमाअन्वयें कोणताही नवा ट्रस्टी नेमला जाईल तेव्हां, मागें उरलेल्या अगर चालू असलेल्या ट्रस्टींमध्यें अगर ट्रस्टीमध्यें अगर कोणत्याहि ट्रस्टीच्या कायदेशीर प्रतिनिधीमध्यें त्या त्या वेळीं निविष्ट असलेली ट्रस्टची सर्व मिळकत, त्या प्रकरणावरून जरूर असेल त्याप्रमाणें, अशा एकट्याच नव्या ट्रस्टीमध्यें, किंवा मागें उरलेल्या किंवा चालू असलेल्या ट्रस्टींबरोबर किंवा ट्रस्टीबरोबर, निविष्ट होईल.

नव्या ट्रस्टीचे अधिकार.

याप्रमाणें नेमलेल्या हरेक नव्या ट्रस्टीला, व हा आक्ट ठरण्यापूर्वीं किंवा ठरल्यानंतर कोर्टानें नेमलेल्या हरेक ट्रस्टीला, ट्रस्टच्या कर्त्यानें त्याचें ट्रस्टीदाखल मूळचेंच नांव सांगितलेलें असतें तर त्याला जे अधिकार, जी अखत्यारी व नजरेस येईल त्याप्रमाणें वागण्याची जी मोकळीक असती, व ज्याप्रमाणें तो सर्व गोष्टींत काम करता, तेच अधिकार, तीच अखत्यारी व तीच मोकळीक असेल, व त्यानें सर्व प्रकारें त्याचप्रमाणें काम केलें पाहिजे.

ट्रस्ट मागें उरतो.

७६. अनेक सहट्रस्टींतून एकजण मरण पावला अगर कामावरून दूर झाला असतां, ट्रस्टच्या लेखामध्यें स्पष्टपणें इतर रीतीनें सांगितलेलें नसल्यास, ट्रस्ट मागें उरतो व ट्रस्टची मिळकत बाकीच्यांकडे जाते.

---

## बाब ८.

### ट्रस्ट नष्ट होणें याविषयीं.

७७. ट्रस्ट, खालील प्रसंगीं नष्ट होतो, ह्मणजे— ट्रस्ट कसा नष्ट होतो.

(अ) त्याचा हेतु पूर्णपणें पुरा होईल तेव्हां; किंवा

(ब) त्याचा हेतु गैरकायदेशीर होईल तेव्हां; किंवा

(क) ट्रस्टच्या मिळकतीचा नाश झाल्यानें अगर इतर रीतीनें त्याचा हेतु पूर्ण होणें अशक्य होईल तेव्हां; किंवा

(ड) ट्रस्ट रद्द करण्यासारखा असून तो स्पष्टपणें रद्द केला असेल तेव्हां.

७८. मृत्युलेखाच्या योगें उत्पन्न केलेला ट्रस्ट, मृत्युलेखकर्त्याच्या खुषीस येईल तेव्हां रद्द करतां येईल. ट्रस्ट रद्द करणें.

इतर रीतीनें उत्पन्न केलेला ट्रस्ट खालील प्रसंगीं मात्र रद्द करतां येईल, ह्मणजे—

(अ) सर्व हिताधिकारी करार करण्याविषयीं लायक असतील तेव्हां, त्यांच्या संमतीनें;

(ब) मृत्युलेखाखेरीज इतर लेखाच्या योगें अथवा तोंडच्या शब्दानें ट्रस्ट कळविलेला असेल तेव्हां, ट्रस्टच्या कर्त्याला स्पष्टपणें राखून ठेवलेला रद्द करण्याचा अधिकार चालवून; किंवा

(क) ट्रस्टच्या कर्त्याचें कर्ज फेडण्याविषयींचा ट्रस्ट असून, धनकोंना तो कळविलेला नसेल त्या प्रसंगीं, ट्रस्टच्या कर्त्याच्या खुषीस येईल तेव्हां.

#### उदाहरण.

अ हा बच्या नांवीं अशा ट्रस्टनें मिळकत करून देतो कीं, बनें ती विकून विक्रीच्या उत्पन्नांतून अच्या धनकोंचीं देणीं द्यावीं. अ ट्रस्ट रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवीत नाहीं. या धनकोंला कांहींच कळविलेलें नसल्यास, अला ट्रस्ट रद्द करतां येईल. परंतु सदरील व्यवस्थेमध्यें त्या धनकोंचें अंग असल्यास, त्यांच्या संमतीवांचून ट्रस्ट रद्द करतां येणार नाहीं.

७९. ट्रस्टच्या बजावणीमध्यें ट्रस्टींनीं योग्य रीतीनें जें कांहीं केलें असेल तें निष्फळ होई अगर त्यास बाध येई अशा रीतीनें ट्रस्टच्या कर्त्याला कोणताच ट्रस्ट रद्द करतां येणार नाहीं. ट्रस्टींनीं योग्य रीतीनें जें कांहीं केलें असेल तें ट्रस्ट रद्द केल्यानें निष्फळ न होणें.

---

## बाब ९.

### ट्रस्टच्या स्वरूपाच्या कित्येक कर्तव्यतांविषयीं.

८० ट्रस्टच्या स्वरूपाची कर्तव्यता खालील बाबतींत उत्पन्न होते. कोणत्या बाबतींत ट्रस्टच्या स्वरूपाची कर्तव्यता उत्पन्न होते.

८१. जेव्हां मिळकतीचा मालक ती तबदील करून देईल अगर मृत्युलेखांत देऊन ठेवील व, त्यासंबंधाच्या हकीकतीशीं जुळे अशा रीतीनें, तींतील हितसंबंधाची व्यवस्था करण्याचा त्याचा इरादा होता असें अनुमान काढतां येत नसेल तेव्हां, तबदील करून घेणारानें अथवा मृत्युलेखदानाधिकाऱ्यानें ती मिळकत मालकाच्या किंवा त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या हिताकरितां धारण केली पाहिजे. हितसंबंधाची व्यवस्था करण्याचा तबदील करणाराचा इरादा होता असें दिसून येत नसेल तेव्हां.

उदाहरणें.

(अ) अ हा मोबदल्यावांचून बच्या नांवीं जमीन करून देतो व तिच्या कोणत्याच भागाचा टस्ट केल्याचें कळवीत नाहीं. त्या जमिनी-मधील हितसंबंध तबदील करण्याचा अचा इरादा होता असें अनुमान सदरहू तबदिलीच्या वेळीं असणाऱ्या हकीकतीशीं जुळे अशा रीतीनें काढतां येत नाहीं. तर ब हा ती जमीन अच्या हिताकरितां धारण करितो.

(ब) अ हा बच्या नांवीं य व झ अशीं दोन शेतें करून देतो, व यबदल ट्रस्ट केल्याचें कळवितो, परंतु झविषयीं कांहींच कळवीत नाहीं. झ-मधील हितसंबंध तबदील करण्याचा अचा इरादा होता असें अनुमान, सदरहू तबदिलीच्या वेळीं असणाऱ्या हकीकतीशीं जुळे अशा रीतीनें काढतां येत नाहीं. तर ब हा झ शेत अच्या हिताकरितां धारण करितो.

(क) अ हा आपल्या व बच्या नांवीं मिळून आपलें अमुक एक स्टॉक तबदील करतो. त्या स्टॉकमधील हितसंबंध आपल्या हयातींत तबदील करण्याचा अचा इरादा होता असें अनुमान, सदरहू तबदिलीच्या वेळीं असणाऱ्या हकीकतीशीं जुळे अशा रीतीनें काढतां येत नाहीं. तर अ व ब हे सदहू स्टॉक अच्या हिताकरितां त्याच्या हयातीपर्यंत धारण करतात.

(ड) अ हा आपली बायको ब हिला अमुक एका जमिनीची देणगी देतो. येथें तिला त्या जमिनींतील हितसंबंध, अकरितां कोणताही ट्रस्ट नसून, मिळतो, कारण ही देणगी बच्या हिताकरितां होती असें अनुमान त्यासंबंधाच्या हकीकतीवरून काढतां येतें.

**मिळकत एकाला तबदील करून दिली असून तिचा मोबदला दुसऱ्यानें दिला असेल तेव्हां.**

८२. एका मनुष्याला मिळकत तबदील करून दिलेली असून तिचा मोबदला दुसऱ्या मनुष्यानें दिला असेल किंवा त्यांबद्दल तजवीज केली असेल, व तबदील करून घेणाराच्या हिताकरतां असा मोबदला देण्याचा अगर त्याबद्दल तजवीज करण्याचा अशा दुसरा मनुष्याचा इरादा नव्हता असें दिसेल, तेव्हां तबदील करून घेणारानें ती मिळकत मोबदला देणाऱ्या अथवा त्याबद्दल तजवीज करणाऱ्या मनुष्याच्या हिताकरतां धारण केली पाहिजे.

या कलमांतील कोणत्याहि मजकुरावरून दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, कलम ३१७ याला, अथवा सन १८९९चा आक्ट ११ (बंगाल इलाख्याच्या ताब्यांतील लोअर प्राव्हिन्सिसमध्यें थकलेल्या महसुलाच्या बाकीबदल जमिनीची विक्री करण्यासंबंधाचा कायदा सुधारण्याबद्दलचा), कलम ३६ याला, बाध येतो असें समजूं नये.

**बजावतां न येण्याजोगा अथवा ट्रस्टची मिळकत निःशेष न होतां बजावलेला ट्रस्ट.**

८३. एकादा ट्रस्ट बजावतां येण्याजोगा नसेल, किंवा ट्रस्ट पूर्णपणें बजावण्यांत आला असून ट्रस्टची मिळकत निःशेष झाली नसेल तेव्हां, उलटपक्षीं आज्ञा नसल्यास, ट्रस्टीनें ट्रस्टचें मिळकत, अथवा शेष राहिलेला तिचा भाग, ट्रस्टच्या कर्त्याच्या अगर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या हितासाठीं धारण केला पाहिजे.

उदाहरणें.

(अ) अ हा कांहीं जमीन बच्या नांवीं—

"ट्रस्टवर" करून देत असून, ट्रस्ट कळविलेला नाहीं; किंवा

"मागून कळवावयाच्या ट्रस्टवर" देतो, आणि तो कधींही कळविला नाहीं; किंवा

अशा मोघम ट्रस्टांवर देतो कीं ते बजावण्यासारखे नाहींत; किंवा

अशा ट्रस्टांवर देतो कीं ते अमलांत येणें अशक्य होतें; किंवा

"ककरतां ट्रस्टनें" देतो, आणि क त्या ट्रस्टखालील आपला हक्कसंबंध सोडून देतो.

तर यांतून प्रत्येक बाबतींत ब हा ती जमीन अच्या हितासाठीं धारण करितो.

(ब) अ हा दरसाल दर शेंकडा चार टक्के व्याजाचे १०,००० रुपये बला अशा ट्रस्टनें तबदील करून देतो कीं, त्यांवर दरसाल उत्पन्न होणारें व्याज त्यानें कला तिच्या हयातीपर्यंत द्यावें. अ मरतो. नंतर क मरते. येथें ब हा सदहू रकम अच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या हिताकरितां धारण करतो.

(क) अ हा अशा ट्रस्टवर बच्या नांवीं जमीन करून देतो कीं, त्यानें ती जमीन विकून विक्रीच्या उत्पन्नापैकीं अर्धे अमुक दानधर्माच्या कारणांकडे लावावें, व बाकीचें अर्धे एका देवाची पूजाअर्चा चालविण्याच्या कामीं लावावें. ब ती जमीन विकतो, परंतु दानधर्माचीं कारणें अगदीं नष्ट होतात, व ती पूजाअर्चा चालविण्याचे कामीं त्या उत्पन्नापैकीं दुसरा अर्धा हिसा निश्शेष होत नाहीं. तर ब हा पहिला अर्धा हिसा आणि दुसऱ्या अर्ध्या हिशाचा खर्च न झालेला भाग हां अच्या अथवा त्याच्या कायदेशीर प्रतिनिधांच्या हितासाठीं धारण करतो.

(ड) कांहीं हेतूंकरतां जमीन विकत घेऊन देण्यासाठीं अ हा बला १०,००० रुपये आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवतो. हे हेतु सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं अमलांत येत नाहींत. तर ब हा त्या पैशामधील अगर जमीन विकत घेतली असल्यास तिच्यांतील राहिलेला हक्कसंबंध अच्या कायदेशीर प्रतिनिधींच्या हितासाठीं धारण करितो.

८४. जेव्हां मिळकतीचा मालक ती गैरकायदेशीर हेतूकरितां दुसऱ्यास तबदील करून देईल व असा हेतु अमलांत आणलेला नसेल, अथवा तबदील करणारा तबदील करून घेणाराइतका दोषी नसेल, अथवा तबदील करून घेणाराला ती मिळकत घेऊं देणें ह्मणजे कोणत्याही एकाद्या कायद्याचे ठराव निष्फळ करण्यासारखें होत असेल, तेव्हां तबदील करून घेणारानें ती मिळकत तबदील करणाराच्या हिताकरितां धारण केली पाहिजे. गैरकायदेशीर हेतूकरितां तबदील.

८५. जेव्हां मृत्युलेख करणारा अमुक एक मिळकत ट्रस्टवर आपल्या मृत्युलेखांत देऊन ठेवील, व ट्रस्टचा हेतु मृत्युलेख पाहिल्याबरोबर गैरकायदेशीर आहे असें दिसेल, अथवा मृत्युलेख करणाराच्या हयातींत मृत्युलेखदानाधिकारी ती मिळकत गैरकायदेशीर हेतूकडे लावण्याची त्याच्याशीं कबुली करील, तेव्हां मृत्युलेखदानाधिकाऱ्यानें ती मिळकत मृत्युलेख करणाराच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या हिताकरितां धारण केली पाहिजे. गैरकायदेशीर हेतूकरितां मृत्युलेखदान.

जेव्हां मिळकत मृत्युलेखांत देऊन ठेविली असेल व तें मृत्युलेखदान रद्द करण्याचें सक्तीनें मना केलें असेल, तेव्हां मृत्युलेखदानाधिकाऱ्यानें ती मिळकत मृत्युलेख करणाराच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या हिताकरितां धारण केली पाहिजे. जें मृत्युलेखदान रद्द करणें सक्तीनें मना केलें असेल तें.

८६. जेव्हां मिळकत, रद्द होण्यास पात्र असणाऱ्या अथवा कपटानें कराविलेल्या अगर चुकीनें केलेल्या करारानुसारें तबदील करून दिली असेल, तेव्हां तबदील करून घेणारानें, त्याबाबद खबर मिळाल्यावर, ती मिळकत, तबदील करून देणाराच्या हिताकरितां धारण केली पाहिजे, मात्र खरोखर अदा केलेला मोबदला तबदील करणारानें परत दिला पाहिजे. रद्द होण्यायोग्य करारानुसारें तबदील.

रिणको हा धनकोचा प्रतिनिधि होणें.

८७. जेव्हां कोणी रिणको हा आपल्या धनकोचा मृत्युलेखचालविणारा अथवा इतर कायदेशीर प्रतिनिधि होईल, तेव्हां त्यानें, देणें असलेलें कर्ज, त्यांत हक्कसंबंध असणाऱ्या मनुष्यांच्या हिताकरितां धारण केलें पाहिजे.

विश्वस्तानें करून घेतलेला फायदा.

८८. जेव्हां कोणी ट्रस्टी, मृत्युलेखचालविणारा, भागीदार, मुखत्यार, कंपनीचा डिरेक्टर, कायद्यासबंधीं सल्ला देणारा, अथवा दुसऱ्या मनुष्याच्या हक्कसंबंधांचें संरक्षण करण्याविषयीं विश्वस्त या नात्यानें बांधलेला इतर मनुष्य, आपल्या अशा नात्याच्या सवडीवर स्वतःकरितां कोणताही द्रव्याचा फायदा करून घेईल तेव्हां, अथवा असा बांधलेला कोणी मनुष्य, ज्या प्रसंगीं आपले स्वत चे हक्कसंबंध अशा दुसऱ्या मनुष्याच्या हक्कसंबंधांस प्रतिकूळ असतील अगर होऊं शकतील अशा प्रसंगीं कोणत्याहि कामांत शिरेल व त्यायोगें स्वतःकरितां कोणताहि द्रव्याचा फायदा करून घेईल तेव्हां, याप्रमाणें करून घेतलेला फायदा त्यानें अशा दुसऱ्या मनुष्याच्या हिताकरितां धारण केला पाहिजे.

**उदाहरणें.**

(अ) अ हा मृत्युलेखचालविणारा असून, ब या मत्युलेखदानाधिकाऱ्यापासून मृत्युलेखाअन्वयें त्यास असणारा हक्क कमी किंमतीला विकत घेतो. मृत्युलेखदानाची किंमत बला ठाऊक नाहीं. तर अनें, दिलेली किंमत व खरी किंमत यांमधील तफावत बच्या हिताकरितां धारण केली पाहिजे.

(ब) अ हा ट्रस्टी असून, ट्रस्टच्या मिळकतीचा आपल्या स्वतःच्या धंद्याकरितां उपयोग करतो. तर अ, अशा उपयोगापासून होणारा नफा आपल्या हिताधिकाऱ्याच्या हितासाठीं धारण करतो.

(क) अ हा ट्रस्टी असून, आपल्या जागीं येऊं इच्छिणाऱ्या कोणा मनुष्याकडून कांहीं पैशाची रकम घेऊन तिच्याबद्दल आपले ट्रस्टचें काम सोडून देतो. तर अ असा पैसा आपल्या हिताधिकाऱ्याच्या हिताकरितां धारण करितो.

(ड) अ हा एक भागीदार असून, आपल्या भागीदारमंडळीच्या फंडानें आपल्या स्वतःच्या नांवें जमीन विकत घेतो. तर अ ती जमीन त्या भागीदारमंडळीच्या हिताकरितां धारण करितो.

(इ) अ हा भागीदार स्वतःच्या व त्याच्या सहभागीदारांच्या वतीनें एक पट्ट्याच्या शर्तीसंबंधीं बोलणें चालविण्याच्या कामीं नेमलेला असून, स्वतःस एक लाख रुपये देण्याविषयीं पट्टयानेंदेणारापाशीं गुप्त रीतीनें ठराव करितो. तर अ हे लख रुपये भागीदारमंडळीच्या हिताकरतां धारण करितो.

(फ) अ व ब हे भागीदार आहेत. अ मरतो. ब तें भागीदारीचें काम बंद न करतां, सर्व मालमत्ता त्या धंद्यांत राहूं देतो. तर मुद्दलापैकीं अच्या हिश्शापासून झालेल्या नफ्याबद्दल बनें अच्या कायदेशीर प्रतिनिधीला हिशोब दिला पाहिजे.

(ग) अ हा ब करितां एक पट्टा मिळविण्यासाठीं नेमलेला मुखत्यार असून, तो पट्टा स्वतःसाठीं मिळवितो. तर अ तो पट्टा बच्या हितासाठीं धारण करितो.

(ह) अ हा पालनकरणारा असून आपल्या ब वार्डच्या [पालन केलेल्या मनुष्याच्या] एस्टेटीवरील बोजे स्वतःकरतां कमी किंमतीला विकत

घेतो. तर अ याप्रमाणें विकत घेतलेलें बोजें बच्या हिताकरितां धारण करितो, आणि जें काय त्यानें खरोखर दिलेलें असेल तेवढाच बोजा तो बवर घालूं शकेल.

८९. जेव्हां दुसऱ्याच्या हक्कसंबंधांस कमीपणा आणून अयोग्य दाबाचे योगें कोणताहि फायदा करून घेतला असेल, तेव्हां मोबदल्यावांचून, अगर असा दाब चालविलेला आहे अशी खबर असून, असा फायदा करून घेणाऱ्या मनुष्यानें, याप्रमाणें ज्या मनुष्याच्या हक्कसंबंधांस बाध आणला त्याच्या हिताकरितां तो फायदा धारण केला पाहिजे. अयोग्य दाब चालवून करून घेतलेला फायदा.

९०. जेव्हां कोणत्याही मिळकतीचा ताहयात भोगवटाकरणारा, सहमालक, गहाणदार [गहाणघेणारा] अगर इतर उप-मालक हा, आपल्या अशा नात्याच्या सवडीवर, त्या मिळकतींत हक्कसंबंध असलेल्या इतर मनुष्यांच्या हक्कांस कमीपणा आणून कांहीं फायदा करून घेईल, किंवा जेव्हां असा कोणताहि मालक, अशा मिळकतींत हक्कसंबंध असणाऱ्या सर्व मनुष्यांचा प्रतिनिधि ह्मणून कोणताही फायदा करून घेईल, तेव्हां त्यानें, याप्रमाणें करून घेतलेला फायदा याप्रमाणें हक्कसंबंध असणाऱ्या सर्व मनुष्यांच्या हितासाठीं धारण केला पाहिजे: मात्र असा फायदा करून घेण्यामध्यें योग्य रीतीनें झालेल्या खर्चाचा आपआपला योग्य हिसा देण्यास, व तो फायदा करून घेण्यामध्यें योग्य रीतीनें प्राप्त झालेल्या जबाबदाऱ्यांबद्दल हामी देण्यास तीं मनुष्यें पात्र आहेत. उप-मालकानें करून घेतलेला फायदा.

## उदाहरणें.

(अ) अ हा पट्ट्यानें धारण केलेल्या मिळकतीचा ताहयात भोगवटाकरणारा असून तो पट्टा आपल्या स्वतःच्या नांवें व आपल्या स्वतःच्या हिताकरितां नवीन करून घेतो. तर अ नवीन करून घेतलेला पट्टा, जुन्या पट्ट्यामध्यें हक्कसंबंध असणाऱ्या सर्व मनुष्यांच्या हितासाठीं धारण करतो.

(ब) एक गांव एका हिंदू कुटुंबाचा आहे. त्या कुटुंबापैकीं एक असामी अ हा सरकाराला नजराणा देऊन त्यायोगें आपलें नांव त्या गांवचा इनामदार ह्मणून दाखल करवून घेतो. तर अ हा तो गांव स्वतःच्या व आपल्या कुटुंबांतील इतर असामींच्या हिताकरितां धारण करतो.

(क) अ हा बजवळ जमीन गहाण ठेवतो व ब ती कबज्यांत घेतो. ती जमीन विक्रीकरितां काढली जाऊन ती आपण खरीद करावी या हेतूनें ब सरकारी महसुलाची बाकी चढूं देतो. त्याप्रमाणें ती जमीन बला विकली जाते. तर ब ती जमीन अच्या हितासाठीं धारण करतो: मात्र त्या गहाणावर यावयाची असलेली रकम व गहाणदार या नात्यानें योग्य रीतीनें त्याला आलेला खर्च हीं त्याला परत मिळालीं पाहिजेत.

९१. जो विशेष रीतीनें पुरा करण्याचें भाग पाडतां येईल असा एकाद्या मिळकतीच्या संबंधानें दुसऱ्या मनुष्यानें केलेला करार चालू असल्याची खबर असून, कोणी मनुष्य ती मिळकत संपादन करील, तेव्हां त्यानें, तो करार अमलांत आणण्याला जरूर असेल तितक्यापुरती ती मिळकत त्या दुसऱ्या मनुष्याच्या हिताकरितां धारण केली पाहिजे. चालू कराराची खबर असून संपादन केलेली मिळकत.

९२. जेव्हां कोणी मनुष्य कांहीं हिताधिकाऱ्यांकरितां ट्रस्टनें धारण करण्यासाठीं मिळकत विकत घेण्याचा करार करील व त्याप्रमाणें ती मिळकत विकत घेईल तेव्हां, तो करार अमलांत आणण्याला जरूर असेल तितक्यापुरती ती मिळकत त्यानें त्यांच्या हिताकरतां धारण केली पाहिजे. ट्रस्टवर धारण करण्यासाठीं मिळकत विकत घेण्याचा करार करणाऱ्या मनुष्याकडून खरेदी.

तोडजोड करणाऱ्या अनेक धनकोंतून एकजणानें गुप्त रीतीनें करून घेतलेला फायदा.

९३. जेव्हां कोणी धनको आपणास येणें असलेल्या कर्जाची तोडजोड करतील, व अशा धनकोंपैकीं एकजण रिणकोबरोबर कांहीं गुप्त तजवीज करून आपल्या सहधनकोंपेक्षां अधिक फायदा अयोग्य रीतीनें करून घेईल तेव्हां, त्यानें याप्रमाणें करून घेतलेला फायदा अशा धनकोंच्या हिताकरतां धारण केला पाहिजे.

ज्यांबद्दल स्पष्टपणें ठरविलेलें नाहीं अशा बाबतींत अन्वयावरून निघणारे ट्रस्ट.

९४. मागील कलमांपैकीं कोणत्याहि कलमाच्या आशयाखालीं न येणाऱ्या ज्या कोणत्याहि बाबतींत ट्रस्ट नसेल, परंतु मिळकतींतील हितसंबंध तिचा कबजा असणाऱ्या मनुष्याचा सर्वांशीं नसेल, त्या बाबतींत त्यानें ती मिळकत, असा हितसंबंध किंवा त्याचा अवशेष भाग (जसें असेल त्याप्रमाणें) ज्या मनुष्यांचा असेल त्यांच्या रास्त मागण्या भागविण्याला जरूर असेल तितक्या पुरती त्यांच्या हिताकरितां धारण केली पाहिजे.

### उदाहरणें.

(अ) अ हा मृत्युलेखचालविणारा असून तो, आपला मृत्युलेखकरणारा ब याचीं सगळीं कर्जें फेडल्यावांचून बची मालमत्ता मृत्युलेखदानाधिकाऱ्यांस वांटून देतो. तर ते मृत्युलेखदानाधिकारी याप्रमाणें वांटलेली मालमत्ता, बच्या धनकोंच्या रास्त मागण्या भागविण्याला जरूर असेल तितक्या पुरती त्यांच्या हिताकरितां धारण करतात.

(ब) अ हा चुकीनें आपण बचा ट्रस्टी आहें असें समजतो, व त्या ट्रस्टच्या भासानें कांहीं पैसा घेतो. तर ब हा अशा पैशाबद्दल हिशोब देण्यास त्याला भाग पाडूं शकेल.

(क) अ हा बला एक लाख रुपयांची देणगी देतो, व १०,००० रुपयापुरती ती देणगी आपल्यास वाटेल तेव्हां रद्द करण्याचा बच्या संमतीनें आपल्याला अधिकार ठेवितो. तर ती देणगी १०,००० रुपयांपुरती निरर्थक होय, व ब ती रकम अच्या हिताकरितां धारण करतो.

कर्तव्यतेनें बद्ध झालेल्या मनुष्याचीं कामें, जबाबदाऱ्या व नालायकी.

९५. या बाबीच्या मागील कलमांपैकीं कोणत्याहि कलमाबरहुकूम मिळकत धारण करणाऱ्या मनुष्यानें, तो ज्या मनुष्याच्या हिताकरतां ती धारण करीत असेल त्या मनुष्याकरतां तिचा आपण ट्रस्टी असल्याप्रमाणेंच त्यानें, साधेल तेथवर, कामें केलीं पाहिजेत, व त्याप्रमाणेंच तो, शक्य असेल तेथवर, जबाबदाऱ्यांस व नालायकीस पात्र आहे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, (अ) तो त्या मिळकतीची रास्त रीतीनें लागवड करील अथवा ती व्यापाराच्या अगर धंद्याच्या कामीं लावील तेव्हां, याप्रमाणें तिची लागवड करण्यामध्यें अगर ती अशा कामीं लावण्यामध्यें त्याला पडलेली मेहनत, त्यानें खर्च केलेलें कौशल्य व त्याचा गेलेला वेळ यांबद्दल त्याला वाजवी मेहनताना मिळण्याचा हक्क आहे; व (ब) ज्या मनुष्याच्या हिताकरतां तो ती मिळकत धारण करीत असेल त्याबरोबर केलेल्या अगर ज्या कोणत्याहि मनुष्याच्या मार्फत तो मनुष्य दावा सांगतो त्याबरोबर केलेल्या करारावरून तो ती धारण करीत असेल तेव्हां, कोर्टाच्या परवानगीशिवाय, ती मिळकत अगर तिचा कोणताहि भाग त्याला विकत घेतां अगर पट्ट्यानें घेतां अगर गहाण घेतां येईल.

खऱ्या भावानें खरीद करणाऱ्यांच्या हक्कांचा बचाव.

९६. या बाबींतील कोणत्याही मजकुरावरून, मोबदला देऊन खऱ्या भावानें तबदील करून घेणाऱ्या मनुष्यांच्या हक्कांची नुकसानी होणार नाहीं, किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या कोणत्याहि कायद्याची टाळाटाळ होई अशा प्रकारची कर्तव्यता उत्पन्न होत नाहीं असें समजावें.

# परिशिष्ट.

## स्टाट्यूट.

| वर्ष व बाब. | लहान सरनामा. | कोठपर्यंत रद्द केला तें. |
|---|---|---|
| २९ चार्लस २, बाब ३. | कपटांविषयीं स्टाट्यूट ... ... | कलमें ७, ८, ९, १० व ११. |

## गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.

| नंबर व वर्ष. | लहान सरनामा. | कोठपर्यंत रद्द केले तें. |
|---|---|---|
| सन १८६६ चा २८ ... | सन १८६६ चा ट्रस्टी व गहाणदार यांच्या अधिकारांविषयीं आक्ट. | कलमें २,३,४,९,३२,३३,३४,३५,३६ व ३७.<br>कलम ४३ यांत "ट्रस्टी" हा शब्द जेथें जेथें येतो तेथें तेथें तो; व ४३ व्या कलमांत "वहिवाट किंवा" आणि "ट्रस्ट-मिळकत किंवा" हे शब्द. |
| सन १८७७ चा १... | सन १८७७ चा विशेष न्यायाचा आक्ट... | १२ व्या कलमांतील पहिलें उदाहरण. |

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १८९७ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—**

# सन १८९७ चा आक्ट ४ था.

**ब्रिटिश हिंदुस्थानांत मासळी मारण्यासंबंधी कित्येक बाबतींबाबद ठराव करण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थी ब्रिटिश हिंदुस्थानांत मासळी मारण्यासंबंधी कित्येक बाबतींबाबद ठराव करणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

*सरनामा, व्याप्ति व सुरुवात.*

१. (१) या आक्टास सन १८९७ चा हिंदुस्थानचा मासळी मारण्याबावद आक्ट असें ह्मणावें.

(२) तो ब्रह्मदेश खेरीज करून सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

*हा आक्ट, मासळी मारण्यासंबंधी इतर कायद्यांस पुरवणीदाखल आहे असें समजून वाचणें.*

२. सन १८८७ चा सामान्य कलमांचा आक्ट याच्या ८ व्या व १० व्या कलमांतील ठरावांस अनुसरून, हा आक्ट, ब्रह्मदेश खेरीज करून ब्रिटिश हिंदुस्थानाच्या कोणत्याहि भागांत मासळी मारण्याच्या संबंधानें जो कोणताहि इतर कायदा विवक्षित कालीं अमलांत असेल त्या कायद्यास पुरवणीदाखल आहे असें समजून वाचावा.

*व्याख्या.*

३. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर,—

(१) "मासळी" या शब्दांत कवचीच्या मासळीचा समावेश होतो.

(२) "कायम यंत्र" याचा अर्थ, जमिनींत बसविलेलें अगर कोणत्याहि इतर प्रकारें कायम केलेलें मासळी धरण्याचें कोणतेंहि जाळें, पिंजरा, सांपळा किंवा इतर साधन असा आहे.

(३) "खासगी जलाशय" याचा अर्थ, जो जलाशय कोणत्याहि मनुष्याची स्वतंत्र मिळकत असेल, किंवा ज्यांत कोणत्याहि मनुष्यास मालक किंवा कौलदार या नात्यानें अगर इतर कोणत्याहि नात्यानें, विवक्षितकालीं मासळी मारण्याचा स्वतंत्र हक्क असेल तो जलाशय असा आहे.

**खुलासा.**—कोणत्याहि जलाशयांत इतर मनुष्यांस रिवाजावरून मासळी मारण्याचा हक्क असेल एवढ्याच केवळ कारणामुळें तो जलाशय या व्याख्येच्या अर्थाप्रमाणें "खासगी जलाशय" असावयाचा बंद होईल असें समजूं नये.

*जमिनीवरील जलाशयांत व समुद्रकिनाऱ्यांवर बारी पदार्थांनीं मासळीचा नाश करणें.*

४. (१) कोणताहि मनुष्य कोणत्याहि जलाशयांत असलेली कोणतीहि मासळी धरण्याच्या किंवा तिचा नाश करण्याच्या इरायानें त्या जलाशयांत कोणत्याहि डैनमैटचा किंवा इतर बारी पदार्थाचा उपयोग करील तर त्यास पराकाष्ठा दोन महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेची, किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(२) पोट-कलम (१) यांत "जलाशय" या शब्दांत समुद्रकिनाऱ्यापासून एका मरीन लीगच्या अंतरांतील समुद्राचा समावेश होतो: आणि अशा समुद्रांत त्या पोट-कलमाअन्वयें जो अपराध केला असेल तो अशा किनाऱ्यावर येऊन भिडणाऱ्या जमिनीवर केलेला आहे असें समजून त्याप्रमाणें त्याचा इन्साफ करण्याचा, त्याबद्दल शिक्षा करण्याचा व त्याची सर्व प्रकारें व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

जलाशयांत विष टाकून मासळीचा नाश करणें.

५. (१) कोणताहि मनुष्य कोणत्याहि जलाशयांत कोणतेंहि विष, चुना किंवा अपकारक पदार्थ, त्याच्या योगानें कोणतीही मासळी धरण्याच्या किंवा तिचा नाश करण्याच्या इरादानें, टाकील, तर त्यास पराकाष्ठा दोन महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेची, किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(२) स्थानिक सरकार, सरकारी ग्याझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून, कोणत्याहि निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांत या कलमाचा अमल तहकूब करण्यास मुखत्यार आहे, व त्याच रीतीनें असा कोणताहि जाहीरनामा कंपेश किंवा रद्द करण्यास मुखत्यार आहे.

स्थानिक सरकारानें केलेल्या कानूंच्या द्वारें निवडक जलाशयांतील मासळीचें संरक्षण.

६. (१) स्थानिक सरकार, या कलमांत पुढें सांगितलेल्या कारणांसाठीं कानू करण्यास मुखत्यार आहे, व सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, जे जलाशय खासगी नाहींत असें स्थानिक सरकार त्या जाहिरनाम्यांत निर्दिष्ट करील त्या जलाशयांस त्या सर्व किंवा त्यांतून कोणत्याहि कानू लागू करण्यास मुखत्यार आहे.

(२) तसेंच स्थानिक सरकार, तसाच जाहिरनामा प्रसिद्ध करून, कोणत्याहि खासगी जलाशयास, त्या जलाशयाच्या मालकाच्या व त्यांत मासळी मारण्याचा विवक्षित काळीं स्वतंत्र हक्क असलेल्या सर्व मनुष्यांच्या लेखी अनुमतानें, अशा कानू किंवा त्यांपैकीं कोणत्याहि कानू लागू करण्यास मुखत्यार आहे.

(३) अशा कानूंमध्यें, खालीं सांगितलेल्या सर्व किंवा कोणत्याहि बाबतींची मनाई करण्याचा किंवा शिस्त ठरविण्याचा अधिकार आहे, ह्मणजे:—

(अ) कायम यंत्रें उभारणें, व त्यांचा उपयोग करणें;

(ब) खुंट रोवणें; आणि

(क) उपयोग करावयाच्या जाळ्यांची लांबी, रुंदी व प्रकार आणि त्यांचा उपयोग करण्याच्या रीति.

(४) तसाच अशा कानूंवरून, कोणत्याहि निर्दिष्ट केलेल्या जलाशयांत दोन वर्षांहून अधिक नाहीं अशा मुदतीपर्यंत कोणत्याहि प्रकारें मासळी मारण्याची मनाई करण्याचाहि अधिकार आहे.

(५) या कलमाअन्वयें कोणतीही कानू करतांना, स्थानिक सरकार—

(अ) तिचें उल्लंघन करण्याबद्दल पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल, आणि तें उल्लंघन करण्याचा क्रम चालू राहील तेव्हां, अपराधाच्या शाबितीचा पहिला ठराव झाल्याच्या तारखेनंतरच्या ज्या ज्या दिवशीं तें उल्लंघन आग्रहानें करण्यांत आल्याबद्दलची शाबिती होईल त्या प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा दहा रुपयांपर्यंत आणखी दंडाची शिक्षा होईल, असें फर्माविण्यास; आणि

(ब) (१) त्या कानूविरुद्ध उभारलेलीं किंवा उपयोग केलेलीं कायम यंत्रें अगर उपयोग केलेलीं जाळीं धरणें, सरकारदाखल करणें व जागचीं उचलून नेणें याबाबद, व

(२) अशा कोणत्याहि कायम यंत्राच्या किंवा जाळ्याच्या योगानें धरलेली कोणतीहि मासळी सरकारदाखल करण्याबाबद,

ठराव करण्यास मुखत्यार आहे.

(६) या कलमाअन्वयें कानू करण्यास जो अधिकार दिला आहे तो, कानू करण्यापूर्वी त्या प्रसिद्ध केल्या पाहिजेत, या शर्तीस पात्र आहे.

या आक्टाअन्वयेंच्या अपराधांबद्दल वारंटावांचून धरणें.

७. कोणताहि पोलीस अमलदार, अगर स्थानिक सरकारानें या बाबतींत ज्या इतर मनुष्यास, नांवानें किंवा कोणताहि हुद्दा धारण करीत असल्याच्या नात्यानें, विवक्षित काळीं मुद्दाम अखत्यार दिला असेल तो मनुष्य, ४ थ्या किंवा ५ व्या कलमाअन्वयें अथवा ६ व्या कलमास अनुसरून केलेल्या कोणत्याहि कानूअन्वयें शिक्षा व्हावयाजोगा कोणताहि अपराध कोणताहि मनुष्य करीत आहे असें त्यास दिसून आल्यास, त्या मनुष्यास,

(अ) त्या मनुष्याचें नांव व पत्ता त्यास माहीत नसेल तर, आणि

(ब) तो मनुष्य आपलें नांव व पत्ता देण्यास नाकारील तर, किंवा नांव व पत्ता दिला असल्यास त्याच्या खरेपणाबद्दल संशय येण्यास कारण असेल तर,

माजिस्ट्रेटाच्या हुकुमावांचून, व वारंटावांचून, धरण्यास मुखत्यार आहे.

(२) या कलमाअन्वयें धरलेल्या मनुष्याच्या नांवाचा व पत्याचा बरोबर शोध लागेपर्यंत त्या मनुष्यास अटकावून ठेवण्याचा अधिकार आहे:

मात्र इतकेंच कीं सदर्हूप्रमाणें धरलेल्या कोणत्याहि मनुष्यास माजिस्ट्रेटापुढें आणण्याकरितां जेवढा वेळ जरूर असेल त्याहून अधिक मुदतीपर्यंत, त्यास अटकावून ठेवण्यासाठीं माजिस्ट्रेटाचा हुकुम नसेल तर, त्यास अटकावून ठेवतां कामा नये.

(सही) जे. एम्. म्याकूफर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.